वर्ष- ११ अंक- ३९ मुंबई, मंगळवार, १२ ऑगस्ट ते १८ ऑगस्ट २०२५ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

PG|2

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

तुमचे केस, तुमच्या आरोग्याचा आरसा

3 बहुभाषक भारताचे भाषिक निर्वसाहतीकरण

कर्जबाजारी टॅक्सीचालकांचा संताप! ओला, उबेर आणि रॅपिडो सारख्या ॲप्स विराधात 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

दहीहंडीचा सराव करताना मुलाचा मृत्यू, वरच्या थरावरून कोसळला 11 वर्षाचा बालगोविंदा, दहिसरमध्ये शोककळा

मुंबई :

गोपाळकाला या उत्सवाला आता अवघे पाच दिवस शिल्लक आहे. या उत्सवात थर लावण्यासाठी गोविंदा पथक महिन्याभराआधीच सरावाला सुरुवात करतात. पण आता काहीच दिवस शिल्लक राहिल्याने अनेक गोविंदा पथकं जोरदार सराव करत आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये मुंबई शहर आणि उपनगरामध्ये दहीहंडीमध्ये उंचच उंच थर लावण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. पण यावेळी उंच थरावरून पडून अनेक गोविंदा जखमी होतात आणि काहींना आपला जीव सुद्धा गमवावा लागतो. अशा घटना बहुतांश वेळा गोपाळकाल्याच्याच दिवशी घडत असतात. पण मुंबई उपनगरातील दहिसर येथे सराव करताना एका 11 वर्षीय बालगोविंदाचा मृत्यू झाल्याची दुदैर्वी घटना घडली आहे. महेश रमेश जाधव असे या मुलाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दहिसर पूवेर्ला असणाऱ्या केतकीडपाडा परिसरात नवतरुण गोविंदा पथक सराव करतो. रविवारी (ता. 11 ऑगस्ट) सुद्धा नेहमीप्रमाणे नवतरुण मंडळाकडून दहीहंडीचे थर रचण्याचा सराव सुरु होता. यावेळी या मंडळाचा बालगोविंदा महेश जाधव हा वरच्या थरावर चढला. पण यावेळी त्याला त्याचा तोल सावरता न आल्याने तो वरच्या थरावरून थेट खाली



पडला. तो वरच्या थरावरून थेट जमिनीवर कोसळल्याने त्याला जबर मार लागला आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळतात दहिसर पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मृतदेहाचा पंचनामा करुन महेश जाधव याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला. दहिसर पोलिसांनी या प्रकरणी अपघाती मृत्यूची नोंद केली आहे. हा प्रकार नेमका कसा घडला, यामध्ये कोणाची चूक होती, त्याचा पाय सटकला की नेमके काय झाले, याचा तपास सध्या दहिसर पोलिसांकडून सुरू आहे.

नेहमी गोपाळकाल्याच्या दिवशी या सणाला गालबोट लागतो. पण यंदा सराव सुरू असतानाच मुंबई उपनगरात बालगोविंदाला आपले प्राण गमवावे लागल्याने अनेकांकडून दुःख व्यक्त करण्यात येत आहे. येत्या 16 ऑगस्टला दहीहंडीचा सण होणार आहे. मुंबईतील दहीहंडी उत्सव जगभरात प्रसिद्ध आहे. या उत्सवात मुंबईतील हजारो गोविंद पथकं सहभागी होत असतात. दहीहंडी फोडताना अनेक मंडळांकडून सात ते नऊ थर रचले जातात. हे थर रचताना अनेक गोविंदा जखमीही होतात. त्यादृष्टीने मुंबईतील प्रशासन तयार असते. राज्य सरकारने गोविंदा पथकांसाठी विमा योजनेची घोषणा केली होती. गोविंदा पथकांना या विम्यासाठी ऑनलाईन अर्ज करावा लागतो. मात्र, ही ऑनलाइन प्रक्रिया अत्यंत किचकट असल्याने मुंबईतील अनेक गोविंदा पथकांनी अजूनपर्यंत हा विमा काढलेला नसल्याची माहिती समोर आली आहे.

गणेशोत्सव तोंडावर; मंडप अर्ज पडून, ८८ गणेश मंडळांच्या अजार्ला परवानगी मिळेना

ठाणे

गणेशोत्सव तोंडावर येऊन ठेपला आहे मात्र अजूनही ८८ गणेश मंडळांच्या अजार्ला परवानगी मिळाली नाही. परवानगी अर्ज महापालिकेत टेबलावर पडून आहेत. वर्तकनगर प्रभाग समिती हद्दीतील एकाच मंडळाला परवानगी देण्यात आली असून उर्वरित मंडळे अजूनही प्रतिक्षा यादीत आहेत. पालिका मिळणार की नाही? हा गहन प्रश्न मंडळाच्या कार्यकर्त्यांना भेडसावत आहे. शहरात ठिकठिकाणी रस्त्यावर, गल्लीत मोठ्या प्रमाणात सार्वजनिक गणेशोत्सवासाठी मंडप उभारले जात आहेत. त्यासाठी ठाणे महापालिका, वाहतूक विभाग आणि अग्निशमन विभागाची परवानगी घेणे अनिवार्य आहे.

मंडप उभारणीवेळी उच्च न्यायालयाने घालून दिलेल्या निदेर्शांचे पालन करणे अत्यावश्यक आहे. परवानगीसाठी मंडळांना विविध कागदपत्रे सादर करावी लागतात. मंडप उभारणीच्या अजासोबत, जागेचा पत्ता, नकाशा, मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची नावे आणि मंडपात फायर सिलिंडर ठेवल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक केले आहे. आतापर्यंत ५८ गणेश मंडळांनी ऑनलाइन, तर ३० मंडळांनी ऑफलाइन अर्ज केले आहेत. ऑफलाइन अर्ज करताना मंडळानी जी कागदपत्रे आहेत ती दिली आहेत. आतापर्यंत केवळ एकाच मंडळाला परवानगी देण्यात आल्याने मंडळांमध्ये नाराजी पसरली आहे. काही मंडळे वषार्नुवर्षे त्याच जागेवर गणेशोत्सव साजरा करतात. त्यामुळे अशा मंडळांनी परवानगी घेण्यापूर्वीच मंडप उभारणीच्या कामाला सुरुवात केली आहे.

आर.एम.सी प्लांट बंदचे आदेश, तरीही काँक्रीटचा पुरवठा सुरूच



बंदी डावलून प्लांट सुरू

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने १ ऑगस्ट रोजी शहरातील तीन आर.एम.सी प्लांट बंद करण्याचे आदेश काढले होते. मात्र हे आदेश धुडकावून शहरात बेकायदेशीरपणे प्लांट सुरू आहेत. शुक्रवारी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख रामभवन शर्मा यांनी एका आरएमसी प्लांटमधील एक सिमेंट मिक्सर वाहन पकडून पोलिसांच्या ताब्यात दिला.काशिगाव पोलिसांनी या सिमेंट मिक्सरच्या चालकाला ताब्यात घेतले आहे.याबाबत पोलिसांकडून तक्रार नोंद करण्याकरिता महापालिकेच्या अधिकार्यांशी संपर्क करण्यात आला.मात्र सुट्टी असल्याने कोणताही प्रतिसाद मिळालेला नव्हता. शुक्रवार संध्याकाळी उशीरापर्यंत याप्रकरणी गुन्हा दाखल नव्हता.

आदेश काय?

मिरा- भाईंदर महानगरपालिकेच्या उपायुक्त कल्पिता पिंपळे यांनी शहरातील तीन आर.एम.सी प्लांट बंद करण्याचा आदेश जारी केला आहे.यामध्ये कॉंक्रीट इंडिया,के.के.जी. आर.एम.सी,स्पेको इन्फ्रास्ट्रक्चर,अशा तीन आर.एम.सी. प्लांटची नावे आहेत.महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी आर.एम.सी प्लांट संदर्भात अधिसूचना प्रसिद्ध करून परवानगीसाठी काही निकष,अटी व शर्ती दिल्या आहेत.यामध्ये आर.एम.सी प्लांटच्या २०० मीटरच्या अंतरात परिघात शाळा,महाविद्यालय किंवा मा. न्यायालय नसावे असे नमूद आहे.मात्र हे सर्व आर.एम.सी.प्लांट २०० मीटर आत शाळा येत असल्याने अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.त्या अनुषंगाने महापालिकेने परवानगीची मुदत संपुष्टात आल्यानंतर नूतनीकरणासाठी पुन्हा परवानगी दिली नाही व आर.एम.सी.प्लांट बंद करण्याचा आदेश देण्यात आले. मात्र प्रशासनाचा आदेश धुडकावत आर.एम.सी प्लांट सुरू असल्याचे आढळून आले आहे.

मिरारोड

बंदी असूनही मिरारोड शहरात सिमेंट प्रकल्प (आरएमसी प्लांट) सुरूच आहेत. शुक्रवारी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख रामभवन शर्मा यांनी एका आरएमसी प्लांटमधील एक सिमेंट मिक्सर वाहन पकडून पोलिसांच्या ताब्यात दिला. सिमेंट कॉंक्रीटच्या आरएमसी प्रकल्पातून मोठ्या प्रमाणात प्रदूषण निर्माण होत आहे. या कारखान्यातून दररोज अवजड वाहने, मिक्सर तसेच वाळूची वाहने ये-जा करत असतात. प्रकल्पांकडून पर्यावरणाच्या सुरक्षेच्या दृष्टीने कोणतेच नियम पाळले जात नाहीत.

तसेच प्रदूषण रोखण्याची कोणतीच यंत्रणा नसल्याने या कारखान्यातून सतत धुळीचे प्रदूषण होत असते. या वाढत्या धूळ आणि प्रदूषणामुळे हवेची गुणवत्ता ढासळून नागरी आरोग्यावरही याचा मोठा परिणाम होत असतो. शिवसेना उपजिल्हाप्रमुख रामभवन शर्मा यांनी यासंदर्भात महापालिका आयुक्त तथा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे लेखी तक्रार करत काशिमीरा परिसरातील पाच आर.एम.सी प्लांट बंद करण्याची मागणी केली होती.

त्यानुसार परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पाचही आर.एम.सी प्लांट बंद करण्याचे आदेश दिले होते. मात्र पालिका प्रशासनाकडून फक्त ३ प्लांट बंद करण्याचे आदेश काढून उर्वरित गजानन कन्ट्रक्शन,आरडीसी कॉंक्रीट इंडिया या दोन आरएमसी प्लांटला अभय दिला आहे,अशी तक्रार आहे.

विद्यार्थी स्कुल व्हॅनला राज्य शासनाकडून ग्रीन सिग्नल, पालकांना दिलासा



मुंबईः

शालेय बसचे वाढीव मासिक दर परवडत नसल्याने आपल्या मुलांच्या वाहतूकीसाठी अनाधिकृत रिक्षाचा पर्याय निवडणाऱ्या राज्यातील तमाम पालकांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने धाडसी पावले टाकली आहेत. शाळकरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतूकीसह रोजगाराच्या संधीसाठी परिवहन विभागाकडून स्कूल व्हॅन परवाने वाटप खुले करण्यात येत आहेत. या बाबतची अधिसूचना जारी होईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. मंत्री सरनाईक म्हणाले की, अत्याधुनिक सुरक्षा व सुविधांनी युक्त असलेली अधिकृत स्कूल व्हॅन धावती करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. परिवहन विभागाने बोलावलेल्या पालक आणि बस संघटना प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत अनधिकृत वाहनांतून विद्यार्थी वाहतूक होत असल्याचा मुद्दा गाजला होता. देशात सुरक्षित विद्यार्थी वाहतूकीसाठी केंद्र सरकारने स्कूल बस नियमावलीचा (ऑटोमोटिव्ह इंडस्ट्री स्टँडर्ड्स अर्थात एआयएस-०६३) आधार घेऊन अद्यावत मानके अर्थात स्कूल व्हॅन नियमावली (एआयएस-२०४) तयार केली आहे. चारचाकी १२+१ आसनापर्यंत विद्यार्थी वाहतूक करण्यासाठी वाहनाला शालेय व्हॅनचा दर्जा देण्यात येणार आहे. सदर वाहने इर-श्क या श्रेणीतील असणारं आहेत. यात चालक ओळखपत्र, आपत्कालीन निर्गमन, वाहन प्रवेश, स्टोरेज रॅक यांच्या स्पष्टतेसह आसन रचना, अग्निशमन अलार्म यंत्रणा, वाहन ट्रॅकिंग अशा आधुनिक सुरक्षा तंत्रज्ञानाचा ही समावेश केला आहे. अशी माहिती परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिली. राज्य सरकारकडून परिवहन विभागामार्फत सन २०१८ पर्यंत स्कूल व्हॅनसाठी परवाने देण्यात येत होते. मात्र स्कूल व्हॅन विद्यार्थी वाहतूकीसाठी असुरक्षित असल्याचे सांगत काहींनी न्यायालयात याचिका दाखल केली होती. केंद्राच्या मानकानुसार राज्य शासनाने नियमावली तयार करून व्हॅन सुरू करण्याबाबतची सूचनावली प्रसिद्ध केली आहे. त्याआधारे राज्य सरकारने हे धोरणात्मक पाऊल टाकले असुन या संदर्भात अधिसूचना जारी होईल, असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी केले. स्कूल बस भाडे न परवडणाऱ्या पालकांसाठी स्कूल व्हॅन पर्याय

स्कूल बस भाडे परवडत नसलेले पालक विद्यार्थी वाहतूकीसाठी अवैध रिक्षाचा पर्याय अवलंबतात. रिक्षाच्या तुलनेत व्हॅनमध्ये अधिक सुरक्षेची तरतूद आहे. व्हॅनचे दरवाजे बंद असतात. चार चाके असल्याने वाहन उलटण्याची शक्यता नगण्य असते. व्हॅनमध्ये शाळेची बॅग, पाण्याची बाटली आणि अन्य साहित्य ठेवण्यासाठी पुरेशी जागा असते. विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतूकीला प्रथम प्राधान्य आहे. सुरक्षित वाहतूकीसह बेरोजगारांना रोजगाराची संधी देण्यासाठी स्कूल व्हॅनला मंजुरी देण्यात येत आहे. नव्या स्कूल व्हॅनमधून विद्यार्थी वाहतूकीचा व्यवसाय सुरू करणाऱ्यांना राज्य सरकारकडून परवाने देण्यात येतील. राज्यात अत्याधुनिक सुरक्षा सुविधांनी युक्त स्कूल व्हॅन धावती करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे. असे प्रताप सरनाईक यांनी पुढे प्रतिपादन केले,

दरोडा टाकण्याच्या तयारीत असणाऱ्या ७ आरोपींना अटक

भाईंदर।

मिरारोड पूर्वेकडील पेणकरपाडा येथे दोन देशी बनावटीचे पिस्टल आणि 8 जिवंत काडतुसांसह दरोडा टाकण्याच्या तयारीत असर्णाया रेकॉर्डवरील 7 आरोपींना अटक करण्यात खंडणी विरोधी पथक आणि गुन्हे शाखा यांना यश आले आहे. 4 ऑगस्ट रोजी सायंकाळी सातच्या सुमारास सुमारास पेणकरपाडा, सनशाईन हॉटेलच्या जवळ मिरारोड पूर्व येथे काही इसम हे दरोडा टाकण्याच्या उद्देशाने घातक हत्यारासह एकत्र येणार असल्याबाबत माहिती प्राप्त झाली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने खात्री करून कारवाई करण्याबाबत खंडणी विरोधी पथक कार्यालयाचे प्रभारी अधिकारी राहुल राख यांनी आदेशित केले. त्याअनुषंगाने खंडणी विरोधी पथकातील अधिकारी अंमलदार यांना सनशाईन हॉटेलजवळील म्हाडा बिल्डींगच्या गेटच्या बाजूला रवाना केले. खंडणी विरोधी पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी दोन पथके तयार



करून या ठिकाणी सापळा रचला. साधारण रात्रौ 9.30 वाजताच्या पेणकरपाडा येथे दोन संशयित कार येऊन थांबल्या. त्यावेळी कारवाई पथकातील सपोनि विलास कुटे, सपोनि विजयेंद्र आंबवडे, पोउपनि कोवे व इतर पोलीस अंमलदार यांनी एका निळ्या रंगाच्या कारचा आणि एक काळ्या रंगाच्या कारमध्ये बसलेल्या इसमांना बाहेर येण्याचा इशारा केला.त्यावेळी काळ्या रंगाच्या कारमधील चालक याने सदर कार ही वेगाने काशिमीरा बाजूकडे पळून घेवून जाण्याचा प्रयत्न केला.

यावेळी पथक क्रमांक 2 मधील सपोनि कुटे व पोलीस अंमलदार यांनी सौम्यबळाचा वापर करुन कार थांबवून सदर कारमध्ये असलेल्या 3 इसमांना बाहेर काढले. सदर झटापटीत कारच्या विंड शिल्डच्या काचा फुटल्या तसेच दुर्सया कारमधील 4 जणांना ताब्यात घेण्यात आले. रोहित वनकार ऊर्फ परमार,(वय 23 वर्षे) , प्रतिक भोईर, (वय 26 वर्षे) , निरज वेखंडे(वय 26 वर्षे,), समीर पालवी(वय 29 वर्षे), भावेश गवाळे(वय 24 वर्षे), अमर मोहन शिर्के(वय 30 वर्षे) आणि विजय दिनेश वारघडे(वय 30 वर्षे) अशी आरोपींची नावे आहेत. ताब्यातील नमूद इसमांची दोन पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्यांच्या ताब्यात दोन देशी बनावटीचे स्टीलचे पिस्टल मॅग्झीन आणि 8 राऊंड पितळी आवरण असलेले तसेच 2 फाईटर पंच, 2 सुती रस्सी, विविध कंपन्यांचे 8 मोबाईल फोन असा मुद्देमाल मिळून आला आहे. नमूद आरोपी हे घातक शस्त्रासह दरोडा टाकण्याची तयारी करून सदर ठिकाणी जमले असताना त्यांना ताब्यात घेण्यात आले असून त्याबाबत काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.तसेच आरोपींना ८ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी रिमांड घेण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास हे सपोनि विजयेंद्र आंबवडे हे करीत आहेत. सदरची कामगिरी ही पोलीस आयुक्त निकेत कौशीक, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) संदीप डोईफोडे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा प्रभारी पोलीस निरीक्षक राहुल राख, सपोनि/विलास कुटे, सपोनि / विजयेंद्र आंबवडे, पोउनि/ओंकार कोवे, सपोउनि. शकील पठाण, पो. हवा. मुस्तकिम पठाण, पोहवा. राजविर संधु, पो. हवा. राजाराम काळे, पोहवा. सुनिल गोमासे, पोहवा. शरद पाटील, पोहवा. अनिल नागरे, पोहवा. अकिल सुतार, पोअं. साकेत माघाडे तसेच सायबर पोलीस ठाणे, सपोउनि. संतोष चव्हाण यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

म्हाडा मुंबई मंडळातर्फे होणार १४९ अनिवासी गाळ्यांचा ई-लिलाव

मुंबई

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे (म्हाडाचा विभागीय घटक) मुंबईमधील विविध गृहनिर्माण प्रकल्पांच्या परिसरातील अनिवासी गाळ्यांच्या विक्रीसाठी आयोजित ई-लिलावाकरिता ऑनलाईन नोंदणी व अर्ज प्रक्रियेला १२ ऑगस्ट, २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपासून प्रारंभ होणार आहे, अशी माहिती मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद बोरीकर यांनी दिली. सदर लिलावात मुंबईतील मुलुंड गव्हाणपाडा येथे ०६ अनिवासी गाळे, कुर्ला- स्वदेशी मिल येथे ०५, तुंगा पवई येथे ०२, कोपरी पवई येथे २३, चारकोप येथे २३, जुने मागाठाणे बोरीवली पूर्व येथे ०६, महावीर नगर कांदिवली पश्चिम येथे ०६ अनिवासी गाळे, प्रतीक्षा नगर सायन येथे ०९, अँटॉप हिल वडाळा येथे ०३, मालवणी मालाड येथे ४६ अनिवासी गाळे, बिंबिसार नगर गोरेगाव पूर्व येथे १७ अनिवासी गाळे व शास्त्री नगर-गोरेगाव, सिद्धार्थ नगर, मजासवाडी जोगेश्वरी पूर्व येथे प्रत्येकी ०१ अनिवासी गाळा विक्रीसाठी उपलब्ध आहे. २८ ऑगस्ट, २०२५ सकाळी ११.०० वाजेपासून सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत संगणकीय प्रणालीमध्ये पात्र ठरलेल्या अर्जदारांसाठी ऑनलाइन बोली स्वरूपातील ई-लिलाव www.eauction.mhada.gov.in या संकेतस्थळावर होणार आहे. दि. २९ ऑगस्ट, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता https://eauction.mhada.gov.in व https://mhada.gov.in या दोन्ही संकेतस्थळांवर ई-लिलावाचा एकत्रित निकाल जाहीर करण्यात येणार आहे. मुंबई मंडळातील अनिवासी गाळ्यांच्या ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी https://eauction.mhada.gov.inसंकेतस्थळावर नोंदणी करणे, ऑनलाईन अर्ज करणे, कागदपत्रे अपलोड करणे, अनामत रक्कम ऑनलाईन भरणे यासाठी दि. १२ ऑगस्ट, २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपासून ते दि. २५ ऑगस्ट, २०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत मुदत देण्यात आली आहे.

पोलीस बातमी पत्र

विविध

२

मुंबई, मंगळवार, १२ ऑगस्ट ते १८ ऑगस्ट २०२५

तुमचे केस, तुमच्या आरोग्याचा आरसा

केस गळणे आणि त्याजागी नवीन केस येणे ही प्रक्रिया नैसर्गिक आहे. त्यामुळे दररोज ऐंशी ते शंभर केस गळणे ही सामान्य बाब आहे. पण केसगळती जेव्हा यापेक्षा जास्त होऊ लागते, तेव्हा शरीरामध्ये असणाऱ्या कोणत्या तरी कमतरतेमुळे केस गळत असण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामागे अनेक तऱ्हेची कारणे असू शकतात.

आनुवंशिकता, एखादा आजार, शरीरामध्ये असणारी लोहाची कमतरता, मानसिक किंवा शारीरिक तणाव, किंवा हवामानातील बदलामुळेही केस प्रमाणाबाहेर गळू शकतात. थायरॉइडच्या असंतुलनामुळेही केस गळू शकतात. तसेच प्रसूतीनंतरही महिलांमध्ये केसगळतीचे प्रमाण वाढते. ही केसगळती रोखण्यासाठी शरीराला लोहाची आवश्यकता असते. शरीरामध्ये हिमोग्लोबिन सामान्य असले, तरी लोहाची कमतरता असू शकते. अनेकदा शरीराला प्रथिनांचे पोषण न मिळाल्यामुळे देखील केसगळती उद्भवू शकते. त्यामुळे जर मोठ्या प्रमाणावर केसगळती होत असेल, तर रक्ताची तपासणी करून घेऊन शरीरामध्ये कोणत्या पोषक घटकाची कमतरता आहे, हे समजून घेता येते, तसेच आहारतज्ज्ञांचा सल्ला घेऊन आपल्या आहारामध्ये सुधारणा करून घेऊन शरीराला आवश्यक ते पोषण मिळेल याची काळजी घेता येऊ शकते.

जर दाट असलेले केस पातळ होत चालले असतील, तर तुमची जीवनशैली याला जबाबदार असू शकते. वारंवार केसांवर केल्या जाणाऱ्या रासायनिक ट्रीटमेंट, केसांची अपुरी निगा, हॉर्मोन्सचे असंतुलन आणि पोषणाची कमतरता या कारणांमुळे केस पातळ होऊ लागतात. वाढत्या वयानिशी देखील केसांचा दाटपणा कमी होत जातो. केस पातळ होण्यामागे नक्की कोणते कारण असू शकेल हे जाणून घेण्याकरिता अनेक प्रकारच्या तपासण्या उपलब्ध आहेत. एकदा कारण स्पष्ट झाले की मग त्यावर उपाययोजना करणे शक्य होते.

जर डोक्यात सतत खाज येत असेल किंवा स्काल्प सतत खपल्या धरल्याप्रमाणे दिसत असेल, तर हे लक्षण सीबम कमी होत असल्याचे आहे. हे लक्षण एक्झिमा किंवा सोरायसिसचे देखील असू शकते.

सततचा मानसिक तणाव, शारीरिक थकवा, किंवा हेअर प्रोडक्ट्सचा अतिवापर यामुळे ही समस्या उद्भवू शकते. शरीरामध्ये लोहाची कमतरता असल्यासही डोके खाजणे, स्काल्पवर खपल्या धरणे अशा तक्रारी उद्भवू शकतात. याकरिता तज्ज्ञांच्या सल्ला घेणे, व त्याप्रमाणे औषधोपचार करणे आवश्यक आहे.

जर केसांमध्ये स्प्लीट एन्ड्स होत असतील, म्हणजेच केस जर टोकाशी दुभंगत असतील, तर हे रोखण्याकरिताही उपचारांची गरज आहे. केस दुभंगण्याची अनेक करणे असू शकतात. हेअर स्टायलिंग करताना हीट प्रोटेक्टंटचा वापर न करता हीट ट्रीटमेंट करणे, ब्लो ड्रायरचा अतिवापर, केसांमध्ये आर्द्रतेची कमतरता, यामुळे केस टोकांशी दुभंगताना आढळतात.

तसेच केस रुक्ष किंवा अतिशय कोरडे असणे, हे हॉर्मोन्सच्या असंतुलनाचे लक्षण असू शकते. यावर तज्ज्ञांच्या सल्ल्याने उपाययोजना करता येते. केस अकाली पांढरे होणे हे शरीरामध्ये 'ब' जीवनसत्त्वाच्या कमतरतेचे लक्षण असू शकते. तसेच थायरॉइडमधील असंतुलनामुळे देखील केस अकाली पांढरे होऊ शकतात.

या समस्यांचे निदान जर योग्य वेळी झाले, तर आवश्यक तो औषधोपचार करून या समस्या संपुष्टात आणता येऊ शकतात.


तुमच्या केसांवरून तुमचे आरोग्य कसे आहे याचा अंदाज बांधता येऊ शकतो. केस गळणे किंवा केस पातळ होणे हे मोठ्या समस्येचे सूचक असू शकते. तज्ज्ञांच्या मते तुमच्या केसांची स्थिती तुमच्या आरोग्याबद्दल बरेच काही सांगू शकते. कारण आपल्या केसांतील 'मायक्रोसर्क्युलेशन' आपल्या शरीरातील हॉर्मोन्सच्या संतुलनावर आणि शरीराला मिळणाऱ्या पोषणावर अवलंबून असते. आपले केस, अगदी सूक्ष्म प्रमाणात का होईना, पण आपल्या शरीरातील कमतरता दर्शवत असतात.



मेंदी वापरण्याचे फायदे व तोटे

मेंदी केसांच्या मुळांना मजबूत बनवते. मेंदीमध्ये मेथीदाण्याची पूड मिसळून हे मिश्रण केसांना लावल्यास केसगळती कमी होते. मेंदीच्या वापरामुळे केस चमकदार, मुलायम होतात. मेंदी नैसर्गिक हेअर कंडिशनर आहे. केसांचे कंडिशनिंग करण्यासाठी मेंदीमध्ये अंडे किंवा दही घालून हे मिश्रण केसांना लावावे. अर्ध्या तासाने कोमट पाण्याने केस धुवून टाकावेत. मेंदीच्या वापराने केसांमधील कोंडा कमी होण्यास मदत होते. मेंदीच्या नियमित वापराने केसांमधील कोंडा गायब होईलच, शिवाय पुन्हा होणारही नाही. मेंदीमध्ये असणारी अँटी फंगल आणि अँटी मायक्रोबियल तत्त्वे डोक्याची खाज कमी करण्यास मदत करतात. मेंदीचा सर्वसामान्य उपयोग डाय जातो. बाजारातील रसायनमिश्रित हेअर डाय वापरण्यापेक्षा मेंदीचा वापर हा सुरक्षित पर्याय आहे. मेंदीमध्ये असलेले टॅनिन केसांच्या कॉर्टेक्समध्ये शिरून केसांना मजबूत बनवते आणि केस मुलायम व चमकदार दिसू लागतात. तसेच केसांचा तेलकटपणा नियंत्रित ठेवण्यासही मेंदी उपयुक्त आहे.

केसांशी निगडित समस्यांवर उपाय म्हणून मेंदी वापरण्याची पद्धत आपल्याकडे फार पूर्वीपासून चालत आली आहे. अगदी आजीपासून ते तरुण नातीपर्यंत सर्वच मुली आणि आता मुलेही केसांच्या आरोग्यासाठी मेंदीचा वापर करणे पसंत करताना दिसतात. मेंदी वापरल्याने केसांवर रंग तर चढतोच, पण त्याशिवाय मेंदीमध्ये असलेली अनेक पोषक तत्त्वे केसांचे आरोग्य सुधारण्यास मदत करतात. पूर्वीच्या काळी, आणि अजूनही काही ठिकाणी मेंदीच्या झाडांची पाने वाटून तो लेप केसांना लावण्याची पद्धत आहे. पण आजकाल मेंदीची पाने वाळवून त्यापासून तयार केलेली मेंदी पावडर बाजारामध्ये सहज उपलब्ध असते. ही मेंदी वापरण्याचे जसे फायदे आहेत, तसेच त्यापासून काही प्रमाणात नुकसानही होऊ शकते.



पण या सर्वांपैकी खात्रीशीर ब्रँडची निवड करावी. अनेक मेंदीमध्ये भेसळ असण्याची शक्यता असते, तसेच त्यामध्ये रसायनांचा वापर केला गेला असण्याचीही शक्यता असते. या भेसळयुक्त किंवा रसायनमिश्रित मेंदीमुळे केसांची हानी होऊ शकते.

रिकाम्या पोटी तुपाचे सेवन करणे फायदेशीर

वजन वाढायला लागले की, आपला आहार नियंत्रित करून ते कसे कमी करावे याबद्दल अनेक जण अनेक सल्ले देत असतात. सर्वात प्रामुख्याने सल्ला दिला जातो, तो तूप न खाण्याचा. त्याचबरोबर सकाळी रिकाम्या पोटी कोमट पाणी, त्यामध्ये मध आणि लिंबू घालून पिणे हा आणि असे अनेक सल्ले दिले जातात. या उपायांनी वजन कमी होते, पण जर आपल्या आहारात आपण वर्ज्य केलेल्या तुपाचा समावेश केला, तर त्याचे अनेक फायदे आपल्या आरोग्याला होऊ शकतात. पण त्याचबरोबर तूप किती खावे आणि कसे खावे याचाही विचार होणे आवश्यक आहे. आयुर्वेदामध्ये सांगितल्याप्रमाणे दररोज सकाळी उठल्याबरोबर इतर काहीही न खाता रिकाम्या पोटी तुपाचे सेवन केल्याने त्याचे अनेक फायदे आपल्या शरीराला मिळतात. यासाठी सकाळी एक ग्लास कोमट पाण्याबरोबर एक चमचा तुपाचे सेवन करावे. त्यानंतर अर्धा तास काहीही खाऊ नये. रिकाम्या पोटी तूप घेतल्याने त्वचेचे आरोग्य सुधारते. त्वचेचा कोरडेपणा नाहीसा होऊन त्वचा मुलायम, नितळ दिसू लागते. तुपामुळे त्वचेला आर्द्रता मिळत असल्याने रुक्ष झालेली त्वचा मृदू होते. सोरायसिससारखे त्वचेचे विकार असणाऱ्यांनी या उपायाचा अवलंब अवश्य करण्याचा प्रयत्न करावा. तुपाच्या सेवनाने सांध्याची दुखणी बरी होण्यास मदत होते. तुपामध्ये असलेली ओमेगा ३ फॅटी ॲसिड्स हाडांचे आरोग्य सुधारण्यास मदत करत असून, रिकाम्या पोटी केल्या गेलेल्या तुपाच्या सेवनाने ऑस्टियोपोरोसिससारखे आजार बरे होण्यास मदत होते.



ब्लड शुगर वाढली हे कसे ओळखाल?

ब्लड शुगर लेव्हल वाढणे, म्हणजेच हायपरग्लायसिमिया. हा अमेरिकेमध्ये 'सायलेंट किलर' म्हणून ओळखला जाणारा विकार आहे. भारतामध्ये ही डायबिटिस या विकाराने ग्रस्त असणाऱ्या लोकांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. मानसिक तणाव, व्यायामाचा अभाव किंवा इतर काही विकारांमुळे ब्लड शुगर लेव्हल वाढताना आढळते. या अवस्थेचे वेळेवर निदान केले गेले नाही, तर रुग्णाच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो.

शुगर लेव्हल वाढण्यासाठी, तुम्ही त्यापूर्वीच्या काही तासांमध्ये काय खाल्ले आहे, हे पाहणे अतिशय महत्त्वाचे ठरते. ब्लड शुगर लेव्हल वाढल्याने शरीरातील पेशी आणि अवयवांना धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे एखाद्या व्यक्तीची ब्लड शुगर लेव्हल सतत वाढत असेल, तर त्याने तातडीने डॉक्टरांचा सल्ला घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. ब्लड शुगर लेव्हल सरासरी पातळीपेक्षा अधिक वाढली आहे हे दाखवून देणारी काही लक्षणे शरीरामध्ये निर्माण होतात. ही लक्षणे दिसून आली, तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

तोंड कोरडे पडत असून, सतत तहान लागणे हे ब्लड शुगर वाढल्याचे लक्षण असू शकते. अशा वेळी रुग्णाच्या तोंडाला सतत कोरड पडते. कितीही पाणी प्यायले तरी तहान भागत नाही. अशा वेळी खूप जास्त पाणी प्यायले जाते आणि परिणामी सतत लघवीला जावे लागते. खूप



पाणी प्यायल्याने खरे तर लघवीचा रंग शुभ्र असायला हवा. पण ब्लड शुगर वाढली असल्यास कितीही पाणी प्यायले तरी लघवीचा रंग गडद दिसतो. अशा वेळी ब्लड शुगर वाढली आहे हे ओळखून त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. ब्लड शुगर जर वाढली असेल, तर दृष्टी काहीशी कमकुवत होऊ लागते. रुग्णाला थोडी लांब असलेली वस्तू स्पष्ट न दिसता, धूसर दिसू लागते. त्याचबरोबर हातपाय सतत गार पडू लागतात. तसेच हातापायांना सतत मुंग्या आल्याची भावना होते. हे लक्षण ही ब्लड शुगर वाढली असल्याचे दर्शवते.

ब्लड शुगर वाढली असल्यास रुग्ण सतत चिडचिड्या मनःस्थितीत असतो, तसेच त्याला सतत शारीरिक थकवा जाणवतो. कुठल्याही गोष्टीवर मन एकाग्र करणे त्याला जड जाते.

ओपनफेस सँडविच

तेच तेच पदार्थ खाऊन कंटाळा येतो. खास करून मुलांच्या डब्यात काय पदार्थ द्यावे हे सुचत नाही. पोळीभाजी नको, पराठे खाऊन कंटाळा आला, सँडविच काय तेच तेच.. मग असे करायचे की हे पदार्थ वेगळ्या रूपात द्यायचे. आता सँडविच. नेहमीचे कसे असते, बटाटा, चटणी, काकडीबरोबर नाही का! मग सँडविचला वेगळे रूप द्यायचे. नेहमीचे सँडविच बंद असते, हे ओपनफेस ठेवायचे.



साहित्य – उकडलेला बटाटा, सिमला मिरची, गाजर, फरसबी, चाट मसाला, चिली फ्लेक्स, जिरे पूड, लसूण, मीठ, लिंबू, ब्रेड, चिझ किंवा बटर.

कृती – उकडलेला बटाटा किसून त्यात हवी तर सिमला मिरची, गाजर, फरसबी काहीही घाला. मात्र अत्यंत बारीक चिरून. आता यात हवा तो मसाला टाका. चाट मसाला, ड्राय हॅर्ब्स, चिली फ्लेक्स, जिरे पूड, लसूण, मीठ, लिंबू रस चांगले एकत्र केले की ब्रेडचे लांबट तुकडे करा. त्यावर हे मिश्रण थापा. वरून चीझ किसून घाला अथवा थोडे बटर घाला. साधारण ग्रील करा किंवा तव्यावर शेकवून द्या. हे सँडविच मेयो किंवा चटणीसोबत खायला द्या.

वॅक्सिंगऐवजी शेव्हिंगचा पर्याय वापरत असाल तर या गोष्टी ठेवा लक्षात

शरीरावर जाड केस येणे होईल नाहीसे

आता लवकरच उन्हाळा सीझन सुरू होईल, समर वाइब्सनुसार आपणही शॉर्ट्स, क्युट ड्रेसेस घालून बाहेर पडण्याच्या विचारात असाल, अशावेळी पायावर जाड केस असले तर असे कपडे कसे घालू? असा प्रश्नही तुम्हाला साहजिक पडेलच. मग अगदी आयत्या वेळी पार्लरमध्ये जाण्याऐवजी आपण घरीच रेझर घेऊन शेव्हिंगचा पर्याय निवडाल, वास्तविक यात काही हरकत नाही, मात्र अनेकदा शेव्हिंगमुळे पुन्हा अंगावर येणारे केस हे नियमित लवेपेक्षा जाडसर येतात आणि पुढच्या वेळी हेच केस पुन्हा काढून टाकताना त्वचेला त्रास होतो. असं होऊ द्यायचं नसल्यास तुम्हाला शेव्हिंगवेळी फक्त काही सोप्पा टिप्स लक्षात ठेवण्याची गरज आहे. अनेक महिलांना वॅक्सिंगमुळे त्रास होतो, तर हेअर रिमूव्हल क्रीम्समुळे त्वचा काळवंडते, असाही काहींचा अनुभव असतो, यावर पर्याय म्हणून रेझरचा वापर हा त्यातल्या त्यात सेफ म्हणता येईल. फक्त रेझर योग्य पद्धतीने वापरला जातोय का, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. ही योग्य पद्धत कोणती आणि शेव्हिंग करताना कोणत्या गोष्टी लक्षात ठेवावयाच्या, हे जाणून घ्या..



कसा वापराल रेझर?



ज्या दिशेनेच रेझर फिरवताना दिशेने केस येतात त्या फिरवा, यामुळे केस मुळासकट निघून जायला मदत होते आणि पुढील वेळेस जाड केस येत नाहीत. रेझर फिरवताना दुखापत होईल इतका जोर लावू नका. हात, पाय, अंडरआर्म्स, गुप्तांग अशा सर्वच ठिकाणी

एकच रेझर वापरू नका. ब्लेड चेंज करणारे रेझर वापरत असाल तर एखादे ब्लेड तीन ते जास्तीत जास्त चार वेळा वापरा. त्यावर नको. शेव्हिंग प्रोसेस सोपी करतील असे मार्ग - जो भाग शेव्ह करायचा आहे तो पाण्याने भिजवा यामुळे केस नरम होतील. हात किंवा पाय, अंडरआर्म्स, प्रायव्हेट पार्टवरील केस काढायचे असतील तरी आधी त्यावर कमी केमिकल्स असलेले शेव्हिंग फोम वापरा, मगच केसांवर रेझरचा वापर करा. यामुळे केस नरम होतात आणि पटकन निघून जातात. शेव्हिंग केल्यानंतर तुमच्या त्वचेची छिद्रे उघडतात. त्यात धूळ जाऊ नये किंवा कोरडेपणा येऊ नये, रेडनेसचा त्रास होऊ नये म्हणून चांगले मॉइश्चरायझर त्वचेला लावा. शेव्ह केल्यानंतर आधी तुम्ही तुमच्या अंडरआर्म्सला ॲलोवेरा जेल किंवा बर्फ लावा. बेबी पावडरने जळजळ होत असल्यास लगेच थांबते.

मिठाई बनवताना साखरेऐवजी

वापरा खजुराची पेस्ट

आपल्या दैनंदिन आहारामध्ये साखरेचा वापर होत असतो. चहा, कॉफी, आणि मुख्य म्हणजे आपल्या आहारातील बहुतेक सर्वच गोड पदार्थांमध्ये साखरेचा वापर नियमित केला जात असतो. केवळ घरी तयार करण्यात आलेल्या पदार्थांतच नव्हे, तर ब्रेड, बिस्किटे, तयार सॉसेस, सँडविच स्प्रेड्स, पॅकेज्ड फळांचे रस, कोल्ड ड्रिंक्स यांमध्येही साखरेचे प्रमाण जास्त असते. रिफाईन्ड साखर अतिप्रमाणात खाल्ल्याने आरोग्याला धोका निर्माण होत असून, तरुण वयातच उच्च रक्तदाब, मधुमेह, इत्यादी विकार उद्भवण्याचे प्रमाण वाढले आहे.



आहारामध्ये साखर जास्त असल्याने चेहऱ्यावर अकाली सुरकुत्या येणे, वारंवार मुरुमे, पुटकुळ्या येणे, इत्यादी लक्षणे दिसू लागतात. त्यामुळेच आहारतज्ज्ञ दैनंदिन आहारामधून साखरेचे प्रमाण कमी करून साखरेऐवजी नैसर्गिक स्वीटनर्स वापरण्याचा सल्ला देत असतात. नैसर्गिक स्वीटनर्समध्ये अनेक पर्याय उपलब्ध असून त्यामध्ये खजुराच्या पेस्टचा समावेश करता येऊ शकतो.

खजुराची विशेषता अशी की त्यामध्ये नैसर्गिक शुगर्ससोबत प्रथिने, फायबर, झिंक, मॅग्नेशियम इत्यादी क्षारही आहेत. शंभर ग्रॅम खजुरामध्ये २८२ किलो कॅलरीज इतकी ऊर्जा असते. त्यामुळे खजुरापासून तयार केली गेलेली पेस्ट किंवा सिरप रिफाईन्ड साखरेऐवजी वापरली जाऊ शकते. खजुराची पेस्ट घरच्या घरी तयार करण्यासाठी केवळ खजूर आणि स्वच्छ पाणी, इतक्याच साहित्याची आवश्यकता आहे. खजुराची पेस्ट बनवण्यासाठी ताजा पिकलेला खजूर पाण्यामध्ये भिजवून ठेवावा. खजूर भिजवण्याआधी त्याच्यातील बिया काढून टाकाव्यात. त्यानंतर गरम पाण्यामध्ये खजूर भिजवावा. हा खजूर रात्रभर पाण्यामध्ये भिजू द्यायचा आहे.

दुसऱ्या दिवशी सकाळी खजूर पाण्यातून काढून घेऊन मिक्सरवर बारीक वाटावा. खजूर भिजवून ठेवलेले पाणी टाकून न देता हे पाणी खजूर मिक्सरवर वाटत असताना घालावे. आवश्यक तितके पाणी घालून आपल्याला हवी तितकी घट्ट किंवा पातळ पेस्ट तयार करून घ्यावी.

या पेस्टमध्ये किंचित मीठ, आवडत असल्यास मध, किंवा दालचिनीची पूड मिसळता येईल. यामुळे या पेस्टला वेगळीच चव येते. खजुराचे सिरप तयार करण्यासाठी खजूर पाण्यामध्ये उकळून घ्यावेत.

त्यानंतर खजूर उकळलेले पाणी गाळून घेऊन खजुराचा गर वेगळा करावा.

मनुके खाण्यास जेवढे स्वादिष्ट आहेत, तेवढेच अन्य ड्रायफ्रुटच्या तुलनेत स्वस्त देखील आहेत. मनुक्यांचा वापर अनेकदा गोड पदार्थांमध्ये केला जातो. याचा स्वाद पदार्थाला चवदार बनवतो. याव्यतिरिक्त मनुके खाण्याचे अनेक फायदे आहेत. हे फायदे जाणून घेऊया...

जाणून घ्या फायदे

मनुके खाण्याचे



शरीराला ताकद मिळते – दररोज मनुके खाल्ल्याने शरीराला ताकद मिळते. मनुक्यात नैसर्गिक साखर असते, जी सहज पचते. यामुळे शरीराला त्वरित ऊर्जा मिळते. मनुक्यात कोलेस्ट्रॉल नसते, ज्यामुळे हृदयाची समस्या असलेल्या रुग्णांसाठी हे चांगले आहे.

बद्धकोष्ठता असणाऱ्यांसाठी फायदेशीर – जर तुम्हाला बद्धकोष्ठता असेल तर मनुके खूपच फायदेशीर आहेत. बद्धकोष्ठतेची समस्या दूर करण्यासाठी मनुके एकप्रकारचे वरदान आहे. मनुक्यांना भिजवून खाल्ल्याने अधिक फायदा होतो.

वजन कमी करण्यासाठी – मनुक्यातील नैसर्गिक साखर तुमच्या शरीराला नुकसान पोहचवत नाही. यामुळे याचे नियमित सेवन केल्याने तुमचे वजन देखील कमी होते.

हाडे मजबूत होतात – हाडे मजबूत करायची असतील तर मनुक्यांचे सेवन नक्की करा.

मनुक्यात कॅलिशियमचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे याचे सेवन दररोज करावे.

फोन चोरी झाल्यास अशा प्रकारे करा बँक डिटेल्स आणि मोबाईल वॉलेटचे रक्षण

हल्ली चोर तुमचा फोन मिळाल्यावर फक्त एकच गोष्ट शोधतात ते म्हणजे तुमचे बँक डिटेल्स. सध्या डिजिटल पेमेंट होत असल्यामुळे एकाच डिव्हाइसमध्ये वेगवेगळ्या ॲप्सचा समावेश असतो. स्मार्टफोन चोरण्यासाठी या डिजिटल वॉलेटपर्यंत पोहोचणं इतकं कठीण नाही. अशा अनेक वाईट घटना देखील घडल्या जिथे फोन चोरीला गेल्यावर बँक डिटेल्स मिळवून चोराने बँक अकाऊंट रिकामं केलं.

अशा प्रकारच्या धोक्यापासून वाचण्यासाठी काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत आणि फोन चोरीला गेल्यावर त्या केल्या पाहिजेत. जर तुमचा फोन हरवला किंवा चोरीला गेला तर तुम्ही पुढील पद्धती अवलंबून तुमच्या फोन किंवा त्यातील डेटाचा गैरवापर टाळू शकता.

सिम कार्ड ब्लॉक करा

फोन हरवल्यावर फोन नंबरचा गैरवापर टाळणं अत्यंत महत्त्वाचं आहे. सिम कार्ड ब्लॉक केल्यास फोनवरील प्रत्येक ते ॲप ब्लॉक करता येतात, जे ओटीपीच्या माध्यमातून ॲक्सेस केले जाऊ शकतात. तुम्ही नवीन सिम कार्डवर जुना नंबर मिळवू शकता. त्यासाठी काही वेळ लागू शकतो, परंतु तुमच्या प्रायव्हसीसाठी आणि मोबाईल वॉलेटच्या सुरक्षेसाठी सिम कार्ड ब्लॉक करणं अत्यंत आवश्यक आहे.

मोबाईल बँकिंग सर्व्हिस बंद करा

फोन चोर तुमचे बँक डिटेल्स सहज मिळवू शकतो, त्यामुळे बँक सर्व्हिस तत्काळ बंद करणं आवश्यक आहे. तुमचे सिम कार्ड आणि मोबाईल बँकिंग ॲप सिंक असतात, त्यामुळे रजिस्टर्ड नंबरवरील ओटीपीविना कोणीतही रक्कम ट्रान्सफर करणं कठीण आहे. परंतु फोन हरवल्यावर दोन्ही ब्लॉक करणे उत्तम.

यूपीआय पेमेंट डीॲक्टिव्हेट करा

जेव्हा तुम्ही ऑनलाइन बँकिंग सेवेपर्यंत पोहचू देत नाही तेव्हा चोर इतर मार्ग शोधू लागतो, ज्यात यूपीआयसारख्या पेमेंट ऑप्शनचा समावेश असतो.

त्यामुळे थोडासाही वेळ न दवडता यूपीआय पेमेंट डीॲक्टिव्हेट करा. यासाठी तुम्हाला तुमच्या बँकेशी संपर्क साधावा लागेल.

सर्व मोबाईल वॉलेट्स ब्लॉक करा



मोबाईल वॉलेट्समुळे आयुष्य सोपं झालंय, परंतु जर तुमचा फोन चुकीच्या हाती पडला तर गुगल पे आणि पेटीएमसारखे मोबाईल वॉलेट महागात पडू शकतात. संबंधित ॲपच्या हेल्प डेस्कशी संपर्क करा आणि जोपर्यंत तुम्ही नवीन डिव्हाइसवर वॉलेट पुन्हा सेट करत नाही, तोपर्यंत ते ब्लॉक करण्यास सांगा.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार, १२ ऑगस्ट ते १८ ऑगस्ट २०२५

संपादकीय

बहुभाषक भारताचे भाषिक निर्वसाहतीकरण



संपादक दिपक मोरेश्वर नाईक

भाषा, संस्कृती आणि अभिव्यक्ती यांच्या अन्योन्यसंबंधांचा मागोवा आपण गेले काही लेख पाहत आहोत. आतापर्यंतच्या चिंतनाचा धागा हा भाषिक वसाहतवादामुळे भारतीय संस्कृतीच्या भारतीय अभिव्यक्तीवर येणार्या मर्यादांच्या दृष्टिकोनातून होता. आज आपण त्याच्या एका वेगळ्या बाजूचा विचार करू. वसाहतवादी प्रभावाने केवळ आपली अभिव्यक्तीच प्रभावित होते असे नाही, तर आपले स्व-विषयक चिंतन आणि आकलनही एक प्रकारे बदलते किंवा बदलले आहे. समाज, संस्कृती आणि राष्ट्र यांच्या अस्तित्वाचे आधार आणि त्यांचे परस्परसंबंध यांचे एक विशिष्ट प्रकारचे चिंतन हिंदू परंपरेत विकसित झाले आहे. दीर्घकाळच्या पाश्चात्य शिक्षणातून, पाश्चात्य भाषांतून या चिंतनाचे अपूर्ण भाषांतर करून व त्या अपूर्ण तसेच, पूर्णत्व मानून आणि या विषयातील पाश्चात्य चिंतनाला, त्यांच्या पारिभाषिक शब्दांना हिंदू तत्सम विचारांशी आणि शब्दयोजनांशी समकक्ष धरून सतत ज्या प्रकारची मांडणी झाली आहे, त्यामुळे आपले विशिष्ट चिंतन आपल्याच विस्मृतीत जाऊ लागले आहे का काय, अशी भीती निर्माण झाली आहे. भाषा, संस्कृती, राष्ट्र या संकल्पनांमधील काही भेदांचा आज आपण विचार करू. आधुनिक राष्ट्रवादाची मातृभूमी समजल्या जाणार्या युरोपचा राष्ट्रवाद हा भाषिक भेदांवर आधारित आहे. युरोपमध्ये पुनरुज्जीवन काळात किंवा त्यानंतरच्या काळात ज्या फ्रेंच किंवा जर्मन राष्ट्रांचे निर्माण किंवा एकीकरण केले गेले, त्यात समान भाषा या तत्त्वाचा आधार मुख्य होता. जर्मन भाषक राज्यांचे एकीकरण हे प्रशियाच्या नेतृत्वाखाली जर्मन एकत्रीकरणाचे मुख्य सूत्र होते. राष्ट्रभावनेस चालना देणार्या जर्मन भाषेतील साहित्याची निर्मिती हा त्या वेळचा जर्मन नेत्यांचा एक प्रमुख आग्रह होता. त्याचबरोबर जर्मन परंपरांचे पुनरुज्जीवन, हाही भाग त्यात होता. खिस्ती धर्माच्या आपल्या अनुभवावरून आपल्याला असे वाटते की, नाताळ हा सर्व खिस्ती लोकांचा महत्त्वाचा सण! पण, तो साजरा करण्यात अनेक स्थानिक भेद आहेत. त्याचबरोबर खिस्ती पंथ स्वीकारला असला, तरी युरोपातील अनेक देशांमध्ये अजूनही त्यांच्या प्राचीन परंपरा विविध स्वरूपात जतन केलेल्या आहेत. एकभाषक लोकांच्या एक परंपरा ॅअसा काहीसा विचार मांडून जर्मन परंपरांचे दृढीकरण अशा आग्रहातून आजचे जर्मन राष्ट्र उभे राहिले आहे. फ्रेंच राज्याच्या निमार्णातही फ्रेंच भाषेचा, किंबहुना पॅरिसच्या फ्रेंच भाषेचा मोठा वाटा आहे. फ्रेंच भाषेच्या विविध बोलींमुळे राष्ट्रीय एकीकरणात कोणतीही अडचण येऊ नये, म्हणून त्यांनी भाषेचे प्रमाणीकरण करून पॅरिसची फ्रेंच भाषा हीच योग्य फ्रेंच असे घोषित केले. स्पेनच्या सीमेवरील फ्रेंच भागात ज्या बोली किंवा भाषा बोलल्या जात, त्यांची जवळीक स्पॅनिश भाषेशी आहे. या भागात ऑसिटान आणि बास्क सारख्या भाषा फ्रेंच बाजूला, तर कॅटलान भाषा स्पेन बाजूला बोलल्या जातात. तरीही पॅरिसची फ्रेंच भाषा ही फ्रेंच भागातील अधिकृत भाषा आहे आणि कॅटलान भाषकांना आज वेगळा देश हवा आहे. थोडयात, भाषिक वेगळेपण आणि भाषिक सपाटीकरण हा युरोपीय देशांच्या राष्ट्रवादाचा गाभा आहे. राष्ट्रवादाची युरोपातील पहिली मांडणी ही भाषिक भेदांच्या आधारावर झाली आहे आणि अजूनही अनेक छोट्या भाषिक गटांना त्यांचे राष्ट्रीय वेगळेपण निर्माण करायचे आहे.

युरोपच्या राष्ट्रवाद संकल्पनेचा उगम आपण एक प्रकारे बायबलमधील बाबेलच्या मनोर्याच्या कथेत पाहू शकतो. या कथेनुसार जगातल्या सर्व मानवांनी (म्हणजे ईश्वराचा संदेश प्राप्त झालेल्या सर्व मानवांनी, त्यात हिंदू वगैरे येत नाहीत) एक मनोरा बांधायचे ठरवले. हा मनोरा त्यांना आकाशात राहणार्या त्यांच्या ईश्वराच्या घरापर्यंत बांधायचा होता. ईश्वराला काही त्यांचा हा स्वतःच्या घरी थेट पोहोचण्याचा प्रकल्प पसंत पडला नाही. त्यामुळे ईश्वराने मानवांमध्ये भेद निर्माण करण्याचे ठरवले. त्याने प्रत्येक समूहास वेगळी भाषा दिली. आता या सर्व लोकांना एकमेकांशी संवाद साधता येईना. परेही परते बोलणे खुंटल्यामुळे आणि वैखरीचा शोध लागला नसल्यामुळे एकंदर प्रकल्प बारगळला आणि बाबेलचा मनोरा काही पूर्ण होऊ शकला नाही. युरोपमधील भाषाभेद हे एक प्रकारे ईश्वरनिर्मित आहेत, असा एक अर्थ या बाबेलच्या मनोर्याच्या कथेचा काढता येतो. त्यामुळे भिन्नभाषक समाज हे भिन्न राष्ट्रे आहेत, अशी समजूत निर्माण होते. भाषा आणि समाज यांच्यातील संबंधांचे हे विशिष्ट आकलन युरोपीय राष्ट्रवादाच्या मुळाशी आहे, असे मानले जाते. या सर्व पार्श्वभूमीवर बहुभाषक भारताच्या राष्ट्रीयत्वाचा आधार काय, हे तपासून पाहायची गरज आहे. राष्ट्र संकल्पना जरी पुरातन असली, तरी राष्ट्रवाद संकल्पना आधुनिक असल्याचे म्हटले जाते. या विधानाचा नेमका गर्भितार्थ समजून घेण्याची आज आवश्यकता आहे. हिंदू (किंवा कोणत्याही अन्य राष्ट्रीय समाजाची) राष्ट्र संकल्पना नाकारून राष्ट्रवाद या ज्ञानशाखेचा अभ्यास हा केवळ आधुनिक काळात मांडल्या गेलेल्या युरोपीय मतापुरता सीमित असल्याचे यातून ध्वनित होते. हिंदू तत्त्वज्ञानाचा भाषा आणि समाज किंवा राष्ट्र यांच्या परस्परसंबंधांचा विचार या सर्व मांडणीहून सर्वथा वेगळा आहे. यासंदर्भात आपण एकं सत विप्रा बहुधा वदन्ति या सूत्राचा किंचित वेगळा अर्थ पाहू शकतो. आधी अनेकदा म्हटल्याप्रमाणे भाषाकुलांमधील सांस्कृतिक फरक हा एका अथार्ने आशयातील सांस्कृतिक फरक असतो. त्याउलट जर आशयात भिन्नता नसेल, तर त्याच्या अभिव्यक्तीतील भिन्नतेने अर्थांतरण होत नाही. एकाच समान भावाचे प्रकटीकरण भिन्न उदाहरणांच्या, उपमांच्या, भाषिक अलंकारांच्या माध्यमातून विविध चिंतक तत्त्ववेत्ते करत असतात. विभिन्न अभिव्यक्तींच्या मागे दडलेला समान भाव समान लोकसमुदाय निश्चित करतो. यातूनच समान संस्कृती आणि समान राष्ट्राचे निर्माण होते. त्यामुळे विभिन्न मानव समाजांची भिन्नता त्यांच्या अभिव्यक्तीच्या भाषेने नव्हे, तर त्यातील आशयामुळे ठरते. याहीपुढे जाऊन अखिल मानवसमाजाचा म्हणून काही समान आशय असतो. त्यामुळे राष्ट्रभिन्नता ही द्वेषमूलक नसून केवळ व्यवहारनिदर्शक असते. युरोपच्या बाह्यांगाकडे लक्ष देण्याच्या प्रवृत्तीस आणि भारताच्या अंतरंगाकडे लक्ष देण्याच्या प्रवृत्तीस अनुसरूनच ही दोन भाषा आणि राष्ट्रीयत्वाच्या संबंधाविषयीची प्रतिमाने आहेत. युरोप केवळ भाषिक भेद पाहतो, तर भारत भाषेच्या पलीकडे जाऊन भावातील समानता पाहतो. त्यामुळे भारतात भिन्नभाषक विविध प्रांत असूनही, त्यांच्यात भिन्न राष्ट्रत्वाची भावना असल्याचे दिसत नाही. भाषेच्या प्रमाणीकरणाचेही प्रयत्न हे ब्रिटिश राजवटीतच झाल्याचे आपल्याला दिसतात. त्यापूर्वी प्रमाण मराठी कुठली, असा प्रश्न कोणी विचारल्याचे आढळत नाही. भाषेच्या विविध बोलींमधील प्रवाहीत्व जपत आणि प्रांतांच्या सीमांवर या बोलींचा मिलाफ होत, भाषांचा कदाचित एक सलग वर्णपटच संपूर्ण भारतीय प्रदेशात अस्तित्वात होता. ज्ञानभाषेचे काम संस्कृतला दिलेले असल्याने इतर भाषांच्या प्रमाणीकरणाची आवश्यकताही नव्हती.

आज आपण पाहत असलेले प्रमाणीकरण कंपनी सरकारच्या काळात ब्रिटिश अधिकार्यांच्या सोयीसाठी जरी झाले असले, तरी असे प्रमाणीकरण व्हावे, ही संकल्पना युरोपच्या भाषिक राष्ट्रवादाच्या संकल्पनेशी जवळीक साधताना आपल्याला दिसते. भाषिक निर्वसाहतीकरणाचा विचार करताना, भाषा आणि राष्ट्र यांमधील संबंधांचा पुनर्विचार आणि या चिंतनाचेच निर्वसाहतीकरण याची प्राधान्याने आवश्यकता आहे. भाषावार प्रांतरचनेचा अवलंब करून आपण स्वातंत्र्यानंतरचे पहिले पाऊल चुकीच्या दिशेने टाकलेलेच आहे. परंतु, यापुढील मार्गक्रमणेत भारतीय भाषांच्या अभिव्यक्तीतील समानतेवर भर देऊन त्यांच्यातील परस्परसंवाद वाढवण्यावर प्रयत्न करणे आवश्यक आहे. मातृभाषेत शिक्षण हे तत्त्व आज सर्वमान्य आहे आणि आपल्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात समाविष्टही केलेले आहे. मात्र, भाषा आणि भाषाशिक्षण याकडे आज संवादकौशल्याचे साधन इतया मर्यादित अथार्ने पाहिले जाते. भाषाशिक्षण म्हणजे, त्या भाषेतील समृद्ध साहित्यपरंपरेचे आणि भाषाशास्त्रविषयक व्याकरणादि विचारांचेही शिक्षण. स्वभाषेचे पक्के सर्वांगीण ज्ञान झाल्यावर आपल्या भाषाकुलातील अन्य भाषाभगिनींचेही आपले ज्ञान स्वाभाविकपणे वाढते आणि त्या भाषांच्या अभिव्यक्तीच्या आशयातील अभिन्नत्व ध्यानात येऊ लागते. स्वभाषेचे ज्ञान मर्यादित राहिल्यास हे आशयातील अभिन्नत्व कसे जाणवू शकेल? आणि अशा जाणिवेच्या अभावातून प्रांतवाद, सीमावाद आणि भिन्न राष्ट्रवाद हेच अंतिमतः निर्माण होणार. हा सर्व विचार ध्यानात घेता, भाषिक निर्वसाहतीकरणाचे काही आयाम आपण निश्चित करू शकतो.

सर्वप्रथम म्हणजे, स्वभाषेचा अभ्यास आणि वापर. सामान्यातिसामान्य व्यवहारापासून उच्च श्रेणीच्या भाषा व्यवहारांमध्ये स्वभाषेचा वापर वाढल्याशिवाय भाषिक निर्वसाहतीकरण शय नाही. स्वभाषेच्या वापरात प्रमाणभाषेचा आग्रह अजिबात न धरणे आता अशय आहे. पण, प्रमाणभाषेस अन्य बोलींपेक्षा श्रेष्ठ न समजणे भावाच्या भारतीय प्रकटीकरणासाठी आवश्यक आहे. हा अभ्यास वाढल्यावर स्वाभाविक घडणारी गोष्ट म्हणजे, आपल्या भाषाभगिनींचे अधिक समृद्ध आकलन आणि त्याचबरोबर संस्कृत भाषेचेही अधिक समृद्ध आकलन. हा दुसरा आयाम सहजसाध्य स्तराच्या पुढे जाऊन समाजाच्या किमान काही वगार्ची भाषिक जाण प्रयत्नपूर्वक अधिक समृद्ध करणे असा असेल. हिंदू संस्कृतीच्या वैशिष्ट्यपूर्ण संकल्पनात्मक विषयांचे प्रकटीकरण आणि ग्रहण किंवा आकलन आग्रहाने भारतीय भाषांच्या माध्यमातूनच करणे आणि भाषांतर न करता मूळ शब्द तसेच वापरून संकल्पनात्मक गोंधळ टाळणे, हा तिसरा आयाम असेल. या तिसर्या आयामाचे प्रभावक्षेत्र हे केवळ भारतीय समाज असे न ठेवता, जागतिक विमर्श या आयामाच्या अंतर्गत प्रयत्नपूर्वक बदलावा लागेल. हे तिन्ही आयाम क्रमागत नसून एकाच वेळी विभिन्न स्तरांवर आपल्याला चालवावे लागतील. जसजसे आपण या दिशेने पुढे मार्गक्रमण करू, तसे कदाचित अधिकचे आयामही ध्यानात येतील. या सर्व आयामांवर सतत काम करीत राहावे लागेल. भाषिक निर्वसाहतीकरण हे सांस्कृतिक व वैचारिक निर्वसाहतीकरणासाठी एक विस्तृत राजमार्ग बनवण्याचे कार्य आहे.

हास्याचा पेटारा !



अमेरिकेच्या यापूर्वीच्या कुठल्याच राष्ट्राध्यक्षांची झाली नसेल, एवढी टिंगल आणि निर्भर्त्सना सध्या डोनाल्ड ट्रम्प यांची जगभर सुरू आहे. खुद्द अमेरिकेतही त्यांच्याबाबत प्रचंड निराशा दाटली असून त्यांच्या विक्षिप्तपणाचे किस्से समाजमाध्यमांतून वेगाने पसरवले जात आहेत. त्यांच्या मानसिक स्थितीविषयी, मानसिक क्षमतेविषयी शंका उपस्थित केल्या जात असून त्यासाठी पाश्चात्त्य मनोवैज्ञानिकांच्या साक्षी काढल्या जात आहेत.


ट्रम्प यांची पहिली कारकीर्दही वादग्रस्त होती. पण, आताएवढी टाकाऊ नव्हती. आज त्यांच्या बौद्धिक, मानसिक क्षमतेबद्दलच्या ज्या चर्चा आंतरराष्ट्रीय माध्यमं करू लागली आहेत, त्याची काही लक्षणं त्या कारकिर्दीतही दिसली होती. पण, याआधीच्या चार वर्षांत अमेरिकेचे वयोवृद्ध अध्यक्ष ज्यो बायडन यांच्या कारकिर्दीकडे पाहिल्यानंतर अमेरिकन मतदाराने घाईघाईने ट्रम्प यांना निवडलं. पण, अमेरिकन मतदाराच्या नशिबी आलेलं हताशपण काही हटलं नाही. झाडातून उठून विहिरीत पडल्यासारखी अमेरिकन मतदाराची अवस्था झाली आहे. सर्वशक्तिमान , जादुई भूमी म्हणून ज्या अमेरिकेकडे, तिथल्या राज्यकर्त्या यंत्रणांकडे आणि प्रशासनाकडे पाहिलं जात होतं, ते सगळं किती पोकळ होतं, याची जाणीव आता जगातल्या सर्व देशांना होऊ लागली आहे. अमेरिकेला पुन्हा गतवैभव मिळवून देऊ , अद्वितीय अशा अमेरिकेला तिचं स्थान पुन्हा मिळालं पाहिजे अशा घोषणा देऊन सत्तेत आलेल्या ट्रम्प यांनी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष, अमेरिकेची धोरणं आणि तिथल्या अतुलनीय-जबर प्रशासनाला ह्यहास्याचा पेटाराह्ण बनवलं आहे. भारतावर २५ टक्के आयात शुल्क लावल्यावर आता पुन्हा ते वाढवण्याची ट्रम्प यांची घोषणा केवळ भारतातच नव्हे, युरोपासह सर्व प्रगत देशात हास्यास्पद ठरली आहे, ती त्यामुळेच. ह्यअमेरिका शत्रू म्हणून जेवढं नुकसान करतो, त्यापेक्षा जास्त मित्र म्हणून करतोह्ण याचा प्रत्यय भारतीयांना पुन्हा एकदा येतो आहे. भारताचा सर्वात विश्वासू मित्र म्हणवून घ्यायचं, भारताला थातुरमातुर मदत करायची आणि दुसऱ्याच दिवशी पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून भरभक्कम अनुदान मिळवून द्यायचं; पहलगाम हल्ला झाल्यानंतरही पाकिस्तानच्या लष्कर प्रमुखांसोबत स्नेहभोजन घडवून आणायचं - या गोष्टी न कळण्याएवढा भारत दुधखुळा नाही आणि दुबळाही नाही, याची जाणीव भारताने करून देणं आवश्यक होतं. ट्रम्प यांच्या २५ टक्क्यांच्या आयात करानंतर आणि आता आणखी आयात कर लादण्याच्या धमकीनंतर भारताने अमेरिकेला जे प्रत्युत्तर दिलं, ते म्हणूनच अत्यंत महत्त्वाचं ठरलं. भारताची प्रतिक्रिया अत्यंत परिपक्व असल्याची प्रतिक्रिया जगातील बहुतेक राष्ट्रांनी व्यक्त केली, ती त्यामुळेच. भारताची अर्थव्यवस्था मुळात ग्राहककेंद्री आहे. निर्यातक्षम अर्थव्यवस्था नाही. त्यामुळे, भारत आणि अमेरिकेतला आयात - निर्यात व्यापाराचा तोल बिघडवून भारताचं कमी; अमेरिकेचंच जास्त नुकसान होणार आहे. भारतातून जी स्वस्त आयात होत होती, जे स्वस्त मनुष्यबळ उपलब्ध होत होतं, त्यायोगे अनेक सेवा भारतातून मिळवता येत होत्या, त्याला अमेरिका पारखी होण्याची शक्यता आहे.

हे करून ट्रम्प नेमकं काय साधणार आहेत? जे ट्रम्पना कळत नाही, ते अमेरिकन प्रशासनात कोणालाच कळत नाही असं समजायचं कारण नाही. प्रशासनाला ते दिसतं आहे. पण, सध्यातरी सूत्र ट्रम्प यांच्या हाती आहेत. अमेरिकन राज्यव्यवस्थेत अध्यक्ष हा सर्वशक्तीमान असतो. एकाच व्यक्तीवर अतिविश्वास ठेऊन व्यवस्थेचा कसा तोटा होतो, हे सध्या अमेरिकेची जनता पाहते आहे. यानंतर कदाचित तिथेही समतोल व्यवस्थेच्या निर्मितीसाठी घटनात्मक दुरुस्त्या करण्याची वेळ येईल! भारतावर २५ टक्क्यांचा आयात कर लावताना ट्रम्प यांनी भारत आणि रशियातील तेल कराराचं कारण पुढे केलं आहे. भारताचा रशियासोबतचा हा करार गेल्या तीन वर्षांपासूनचा आहे. रशिया भारताला जगात सर्वाधिक स्वस्त तेल आणि काही लष्करी यंत्रसामग्री देत असेल, तर ती भारताने का घ्यायची नाही? कोणत्याही सार्वभौम देशाला त्याच्या फायद्यानुसार व्यापार करण्याचा हक्क आहे. तो भारतालाही आहे. अमेरिका आणि काही युरोपी राष्ट्र जेव्हा भारताच्या मजीर्चा विचार न करता पाकिस्तानला वाट्टेल तशी मदत करतात, तेव्हा भारताने व्यक्त केलेल्या नाराजीकडे ही राष्ट्र किती गंभीरपणे पाहतात?

रशिया हा खरं तर भारताचा सर्वात जुना, अत्यंत जवळचा मित्र. मध्यंतरी भारताच्याच बदललेल्या परराष्ट्रनीतीने तो दूर गेला होता. अमेरिकेला तो शत्रू वाटतो, म्हणून भारतानेही त्याला शत्रू मानावं अशी अमेरिकेची अपेक्षा असेल, तर अमेरिकेने भारताबरोबर आपली सच्ची मैत्री असल्याचे पुरावे द्यायला हवेत. तसं वागून दाखवायला हवं. केवळ दादागिरीच्या बळावर कोणी कितीही दम दिले, तर ते भारताने का जुमानावेत? भारताने तशीच प्रतिक्रिया दिली. विशेष आनंदाची बाब म्हणजे, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादीमीर पुतीन यांनीही तीच भावना बोलून दाखवली. अमेरिका, युरोपादी पाश्चिमात्य देशांचे स्वतःसाठी वेगळे निकष असतात आणि इतरांसाठी वेगळे. भारताने रशियाबरोबर तेल आयातीचा करार केला,

त्याचवेळी अमेरिका आणि युरोपनेही रशियावर यासंदर्भात त्यांनी घातलेले निर्बंध उठवले होते. कॅनडा, नॉर्वे, स्वित्झर्लंड, इंग्लंड आणि अमेरिकेने रशियातून तेल उत्पादनाच्या आयातीला अनुकूल धोरण घेतलं होतं. अमेरिकेतल्या तेव्हांच्या सरकारने भारत - रशिया कराराचं स्वागत करताना भारताच्या ऊर्जाविषयी गरजा पूर्ण करण्यासाठी आणि भारतीय ग्राहकांना किफायती दरात क्रुडतेल उत्पादनं मिळण्यासाठी हा करार उपयुक्त ठरेल असा सकारात्मक सूर लावला होता. मग आत्ताच ट्रम्प यांना तो करार आणि त्या कराराद्वारे होणारा व्यापार का खटकावा? पाश्चात्त्यांच्या सोयी - गैरसोयीने, त्यांच्या बदलत्या हितसंबंधांनुसार पूर्वेकडच्या देशांनी; विशेषतः भारताने आपल्या परराष्ट्रीय धोरणात आणि व्यापारात बदल का करावा? त्यांची ही दादागिरी का खपवून घ्यावी? भारताने ट्रम्प यांची धमकी अगदी सहज आणि ठामपणे उडवून लावली, हे योग्यच केलं. त्यानंतरच्या उपाययोजनाही आता लगेच करायला हव्यात.

मोअर इक्वल्सना धडा



जॉर्ज ऑरवेल या लेखकाची ॲनिमल फार्म प्रसिद्ध कादंबरी आहे. त्यात डुकरांना शक्तीशाली होताना पाहून एक वाक्य प्रसिद्ध आहे ते म्हणजे इन पोलिटिक्स ऑल मेन आर इक्वल बट सम आर मोर इक्वल. अशाच मोअर इक्वल्सनी सध्या राजकारणात धुमाकूळ घातला आहे. ते प्रत्येक राज्यात आहेत तसेच प्रत्येक पक्षात आहेत. माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांचे नातू आणि कर्नाटकचे एकेकाळचे खासदार प्रज्वल रेवण्णा लैंगिक बलात्कार प्रकरणात दोषी आढळला आणि त्याला जन्मठेपेची शिक्षा झाली. त्यामुळे राजकारणातील सत्तेच्या दारातून कितीही पाशवीकांड करण्यात माणसे कशी कसूर करत नाहीत याचे आणखी एक उदाहरण भारतीयांच्या समोर आले. प्रज्वल हा हसन या कर्नाटकातील मतदारसंघाचा खासदार होता. त्याचे महिलांचा लैंगिक छळ करण्याचे हे प्रकरण समोर आले आणि रेवण्णा याला जन्मठेप झाली, पण या निमित्ताने राजकीय पक्ष आपल्या अशा कृत्यांसाठी राजकारणातील पदांचा कसा दुरुपयोग करतात आणि त्यासाठी कुणाच्याही पायाशी कशी लोळण घेतात हे समोर आले. रेवण्णा याच्याकडे सत्ता आली ती कुटुंबातील अमर्याद सत्तेमुळे आणि त्यातून त्याचा अहंकार वाढला. मग घरात काम करणाऱ्या महिलांचे लैंगिक शोषणाचे प्रकार सुरू झाले आणि त्यामुळे त्याचे मनोधैर्य वाढले. त्यातच देवैगौडा यांनी भाजपशी जवळीक साधली आणि मग मोदी यांच्या वळचणीखाली ते अनिर्बंध सत्ता उपभोगू लागले. प्रज्वल रेवण्णा यात उदय आणि अस्ताची कहाणी भारतीय मनाला विचार करायला लावणारी आहे. जेडीएस म्हणजे जनता दल धर्मनिरपेक्ष या पक्षाचा एकमेव खासदार असलेल्या प्रज्वल याला २०१९ नंतर पक्षातून निलंबित करण्यात आले आणि महिलांवर लैंगिक अत्याचार प्रकरणात त्याच्यावर विविध आरोप झाल्यावर एसआयटीने त्यांची चौकशी केली. त्यात तो दोषी आढळला आणि आता तर विशेष सत्र न्यायालयाने त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली. प्रज्वल याने न्यायालयात युक्तीवाद करताना असे म्हटले की, मला कमी शिक्षा व्हावी कारण मी बीई आहे आणि महाविद्यायात सतत मी टॉपर राहत असे, पण याचा अर्थ असा नाही की शिक्षणात टॉपर राहिला की, न्यायालय त्याच्या लैंगिक गुन्ह्याबद्दल दया दाखवेल. तेच प्रज्वल प्रकरणात घडले आणि महिलांवरील बलात्कार आणि फक्त एक नाही तर अन्य कित्येक प्रकरणे आहेत की ज्यात प्रज्वल आरोपी आहे आणि अनेक महिला त्यात बळी पडल्या आहे. त्यामुळे प्रज्वल याच्याबाबतीत न्यायालयाने कसलीही लेनिअन्सी दाखवली नाही आणि त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली. यामुळे राजकारणात आपण कितीही मोठ्या घराण्याचे वारसदार असलो तरीही गुन्हा तो गुन्हाच आणि त्यामुळे त्याला सोडता कामा नये असा दंडक ज्या आपल्या पूर्वसुरीनी घालून दिला आहे त्याचे पालन न्यायालयाने केले असे दिसते. या प्रकरणाचा राजकीय फायदा घेणार नाही तर ते राजकीय पक्षच नाही. अर्थात काँग्रेसने या प्रकरणात पंतप्रधान मोदी यांच्यावर निशाणा साधण्याचा प्रयत्न केला, पण प्रज्वल रेवण्णा याच्या काकांना म्हणजे कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री एच. डी. कुमारस्वामी यांच्याशी युती काँग्रेसनेच केली होती. कर्नाटक सरकारने मदत केल्यानेच प्रज्वल रेवण्णा मध्यंतरी जर्मनीला पळून गेला होता. प्रज्वल यांच्या लैगिक शोषणासंबंधी केलेल्या आरोपांची चौकशी स्थापन केलेल्या प्रकरणी त्याला एसआयटीने अटक केली आणि त्यांच्यावर खटला चालवून त्यांना शिक्षा ठोठावली, पण राजकारणात सत्तेतून पैसा आणि त्यातून अमर्याद सत्तेचा वापर आणि मग कुणावरही अत्याचार करण्यास राजकारण्यांचे चेलेचपाटे कसे मोकळे होतात याचे उदाहरण समोर आले. प्रज्वल याला शिक्षा झाली. पण त्यानिमित्ताने आणखी एक सत्तेतील घराणे अमर्याद सत्तेने कसे माजोरी झाले होते आणि त्याला न्यायालयाने कसा लगाम घातला आहे हे सिद्ध झाले. प्रज्वल रेवण्णा याचे नाव एकेकाळी कर्नाटकातील उगवता तारा असे घेतले जात होते. आता त्याचे रूपांतर रसातळाला गेलेल्या राजकीय नेत्यात झाले. त्याचा उदय जसा नाट्यपूर्ण होता तसेच पतनही नाट्यपूर्ण आहे. कुटुंबातील सत्तेचा वापर करून राजकारणात अनिर्बंध सत्ता उपभोगताना घराणी कशी पतन पावतात याचे प्रज्वल रेवण्णा उत्तम उदाहरण आहे. कर्नाटक महिला आयोगाने विनंती केल्यावरून त्याच्याविरोधात एसआयटी नेमली आणि तिचा झटपट निकालही लागला. स्वतःला मोअर इक्वल समजणाऱ्या राजकारण्यांची आणि त्या बळावर अनिर्बंध सत्तेचा गैरवापर करण्याची अशी असंख्य उदाहरणे सापडतील. त्यांना प्रज्वल रेवण्णा प्रकरण हा एक धडा आहे. आता या प्रकरणाचे राजकीय पडसाद उमटणार यात काही शंका नाही. एकूणच देशातील सत्तेच्या जोरावर महिलांचे लैगिक शोषण करणाऱ्या राजकीय नेत्यांना हे प्रकरण म्हणजे एक सणसणीत चपराक आहे असे म्हणता येईल. ज्या महिलेने तक्रार केली तिच्या धैर्याला सलाम करावा लागेल कारण तिने इतके मोठे कुटुंब आणि माजी पंतप्रधानाचा नातू असलेल्या प्रज्वलपुढे हार मानली नाही आणि ती न्यायाची लढाई लढत राहिली. त्यामुळे प्रज्वलला शिक्षा होऊ शकली हे आपण विसरता कामा नये. प्रज्वल याचे आयुष्य तर बरबाद झालेच आहे आणि आता कुणी त्याला वाचवेल अशी शक्यता दिसत नाही. तसे झाले तर भारतीय लोकशाहीचे ते सुदैव असेल, पण प्रज्वल याला शिक्षा ठोठावणाऱ्या न्यायव्यवस्थेला आणि त्या महिलेला सलाम. जिने ठाम राहून आपले आरोप कायम ठेवले आणि त्यामुळे प्रज्वल आज कायमसाठी तुरुंगात गेला आहे. पेन ड्राईव्हचा वापर हसनमध्ये प्रज्वलने केला होता आणि तोच त्याच्या अंगलट आला. कारण महिलांचे लैंगिक शोषणाचे त्याने व्हिडिओ काढले होते आणि ते सक्युर्लेटही केले. पण न्यायालयात त्याचे काळे कारनामे समोर आले आणि त्याच्याविरोधात अनेक पुरावे गोळा करण्यात आले. प्रज्वल प्रकरणाने राजकारणात मोअर इक्वल्सना शिक्षा होऊ शकते आणि तेही गजाआड जातात हा संदेश देण्यात आला आहे.

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

4

मुंबई, मंगळवार, १२ ऑगस्ट ते १८ ऑगस्ट २०२५

कर्जबाजारी टॅक्सीचालकांचा संताप! ओला, उबेर आणि रॅपिडो सारख्या ॲप्स विराधात आंदोलनाचा इशारा

मुंबई।

ॲपआधारित रिक्षा व टॅक्सीचालकांना भेडसावणाऱ्या समस्यांवर तोडगा काढण्याऐवजी परदेशी खासगी संस्थांच्या माध्यमातून एक नवीन ॲप चालू करण्याची तयारी सरकारने सुरू केली आहे. मात्र या निर्णयाविरोधात चालकांमध्ये संतापाची तीव्र लाट उमटली आहे. अनेक चालकांवर कजार्चा डोंगर आहे, त्यात ओला-उबरसारख्या कंपन्यांकडून आपल्यावर अन्याय होत असल्याची त्यांची तक्रार आहे. अशा परिस्थितीत या कंपन्यांवर अंकुश ठेवण्याबाबत सरकारकडून कोणतेही उपाय केले जात नसताना नव्या ॲपचा घाट घालण्यात येत आहे. त्यामुळे प्रलंबित मागण्यांकडे सरकारने दुर्लक्ष केल्यास पुन्हा आंदोलन छेडण्याचा इशारा चालकांनी दिला आहे. ओला, उबेर, रॅपिडोसारख्या कंपन्या परदेशी गुंतवणुकीच्या माध्यमातून राज्यातील रिक्षा व टॅक्सी चालवणाऱ्या युवकांचे आर्थिक शोषण करत आहेत, तसेच प्रवाशांचीही आर्थिक पिळवणूक होत आहे, अशी तक्रार करून या चालकांनी नुकतेच आंदोलन केले होते, मात्र उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर काही दिवसांसाठी आंदोलन स्थगित करण्यात आले. मात्र त्यानंतर राज्य सरकारने कंपन्यांवर वचक ठेवून चालकांना योग्य मोबदला देण्यासाठी सूचना देणे गरजेचे होते. प्रत्यक्षात सरकार ॲप तयार करत असून कंपन्यांसाठी अद्याप कोणतीही नियमावली लागू



केलेली नाही. सुरुवातीला चांगला मोबदला मिळत असल्याने मुंबईसह राज्यात चालकांनी कर्ज काढून वाहनांची खरेदी केली आहे.

अनेक कुटुंबीयांचा उदरनिर्वाहाचा मुख्य आधार याच रिक्षा-टॅक्सींवर आहे. मात्र सरकारच्या निर्णयामुळे चालकांच्या समस्या 'जैसे थे' राहणार आहेत. ॲपआधारित रिक्षा, टॅक्सी, बसचालकांचे प्रश्न सरकारने प्रथमिकतेने सोडवणे गरजेचे होते. कंपन्यांवर लगाम ठेवणे गरजेचे असताना सरकार बाजारात स्पर्धेसाठी उतरत आहे. यात सरकारचा फायदा होणार आहे. मात्र चालकांच्या हिताचा निर्णय परिवहन विभाग घेणार की नाही, अशा प्रश्न हे चालक उपस्थित करत आहेत. आंदोलनावर तोडगा काढण्याऐवजी त्या माध्यमातून खासगी संस्थांना मोबाइल ॲप्लिकेशन काढून देण्याचा परिवहन मंत्र्यांचा प्रयत्न दिसत आहे. त्यामुळे सर्वांत मोठे नुकसान चालकांचे होणार आहे. कंपन्या निरंकुश राहिल्याने चालक आणि प्रवाशांची लूट सुरूच राहणार आहे, अशी प्रतिक्रिया चालकांमधून उमटत आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या भूमिकेचा आम्ही जाहीर निषेध करत असून पुन्हा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र कामगार सभेचे अध्यक्ष डॉ. केशव क्षीरसागर यांनी दिला आहे. शहरातील वाहतूककोंडी कमी करण्यासाठी विविध उपाययोजनांवर विचार होत आहेत. मुंबै बँकेच्या माध्यमातून नवीन पाच हजार वाहने रस्त्यावर आणण्याचा राज्य सरकारचा मानस आहे. शहरात विद्यमान धावत असलेल्या वाहनांना उभे करण्यासाठी जागा उपलब्ध नाही. अशातच नवी वाहने कुठे उभी करणार, त्यासाठी कोणतेही धोरण परिवहन विभागाकडे नाही. त्यामुळे वाहतूककोंडी आणि वाहनतळाचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता

कबुतरांना अन्नपाणी देण्याची बंदी कायम; मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय

मुंबई

उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर मुंबई महानगरपालिकेने दादर स्टेशनजवळील कबुतरखाना २ जुलै रोजी बंद केला होता. याप्रकरणी बुधवारी (६ ऑगस्ट) सकाळी जैन समाजातील लोकांना आंदोलन केले होते. मात्र शांततेत सुरू असलेल्या आंदोलनाने अचानक आक्रमक रुप धारण केले. आंदोलकांनी कबुतरखान्याला लावलेली ताडपत्री हटवली आणि तेथील बांबू काढून फेकले होते. यानंतर कबुतरखाना सुरू करण्यात आला होता. मात्र गुरुवारी (०७ ऑगस्ट) मुंबई उच्च न्यायालयात पार पडलेल्या सुनावणीवेळी कबुतरांना अन्नपाणी देण्याची बंदी कायम ठेवण्यात आली आहे. तसेच तसेच तज्ञ समिती स्थापन करून सखोल अभ्यास करण्याचे



निर्देश दिले आहेत. मुंबई उच्च न्यायालयात सुनावणीला सुरुवात झाल्यानंतर डॉक्टरांचा अहवाल वाचून दाखवण्यात आला. त्यानंतर न्यायमूर्ती कुलकर्णी म्हणाले की, कबुतरखाण्यासंदर्भात डॉक्टरांची समिती तयार करण्याबाबत चर्चा सुरू आहे. एनिमल वेलफियर असोशिएशनने आपले उत्तर न्यायालयात दिले आहे. कबुतरांना खायला घालण्याची नियमावली न्यायालयात सादर केली आहे. तसेच मुंबई महानगरपालिकेचे प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले आहेत. याशिवाय पुरातत्व विभागाचे अधिकारी विठ्ठल यादव यांचेही कबुतरखाना ऐतहासिक असल्याने म्हणणे आहे.

परंतु आम्ही डॉक्टरांच्या अहवालावर आधारित कबुतरखाने बंद करण्याचा निर्णय दिला होता, तरी याच्याविरोधात जाऊन सरकारला निर्णय घ्यायचा असेल तर सार्वजनिक आरोग्याच काय? तिथून हजारो लोक रोज प्रवास करतात त्यांच्या आरोग्यच काय? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. न्यायमूर्ती कुलकर्णी म्हणाले की, २०१८ चा डॉक्टराचा अहवाल आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, कबुतरांमुळे आजाराचा प्रादुर्भाव होऊ शकतो आणि श्वसनाचे आजार होतात. त्यामुळे कबुतर खाने रहिवाशी स्थानापासून काढले पाहिजेत. याचपार्श्वभूमीवर आम्हाला काही लोकांचा नाही तर सर्व लोकांचा विचार करायचा आहे. कारण सर्व सार्वजनिक जागांवरून नागरिकांची ये-जा होत असते. त्यामुळे आमचे म्हणणे आहे की, या प्रकरणात सरकार आणि महापालिका काय निर्णय घेतात, ते घेऊद्यात. कारणं हा त्यांचा विषय आहे. परंतु त्या जागांवरून हजारे ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुले ये-जा करत असतात. त्यामुळे आम्हाला समतोल राखायला हवा, असे मत न्यायमूर्तींनी मांडले. न्यायमूर्ती कुलकर्णी म्हणाले की, राज्य शासनाचे कर्तव्य आहे की, तज्ज्ञांचीसमिती तयार करावी आणि त्यात डॉक्टरांचा समावेश असावा.

तुम्ही आणि आम्ही यामध्ये तज्ज्ञ नाही, त्यामुळे समितीचा अहवालाचा आपण सर्वांना मान्य करायला हवा. त्यात मुंबईतील सगळ्या महत्त्वाच्या रुग्णालयातील कोणत्या डॉक्टरांचा समावेश करायचा, याचा निर्णय सरकार घेईल, असे न्यायमूर्तींनी स्पष्ट केले. याचवेळी याचिकाकर्त्यांच्या बाजूने भूमिका वकिलाने सकाळी एक तास म्हणजेच 6 ते 7 वाजेपर्यंत आम्हाला कबुतरांना अन्नपानी देण्याची परवानगी द्यावी, अशी

एक वर्ष थांबा, मुंबई-गोवा महामागार्बाबत शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची मोठी घोषणा



पनवेल

१८ वर्षांपासून रेंगाळलेल्या मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे अनेक मंत्र्यांनी दौरे केले, अनेक डेडलाईन दिल्या. मात्र, या महामार्गाने सगळ्यांचा विचका केला आहे. या पार्श्वभूमिवर सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी मुंबई-गोवा महामार्गाचा गुरुवारी (७ ऑगस्ट) दौरा करत वर्षभरात सर्वकाही ठीक होईल, असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे यंदाच्या गणेशोत्सवाच्या प्रवासाकरिता तात्पुरती खड्डेदुरुस्ती केला जाईल, तरीही कोकणवासीयांना खड्ड्यांतून प्रवास करावा लागेल, हे स्पष्ट झाले आहे. मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम कधी पूर्ण होईल, हे आतापर्यंत कोणत्याही मंत्र्यांना ठामपणे सांगता आलेले नाही. त्यांनी दिलेल्या सर्व डेडलाईन रोडरोलरखाली चिरडल्या गेल्या आहेत. मात्र, मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी कामाला वेग आणला असून त्यांनी कामाबाबत पारदर्शकता दाखवली आहे. आजमितीला ९० ते ९५ टक्के काम पूर्ण झाले असून काही महत्त्वाची कामे खोळंबल्याने एक वर्षात सर्व कामे पूर्ण होऊन १०० टक्के पूर्ण होतील, असा दावा मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले या दौऱ्यात केला आहे.

...म्हणून कामे रेंगाळली - भोसले

1. महामार्गाचे काम करणाऱ्या एजन्सी काही ठिकाणी चांगल्या नव्हत्या
2. जमिनी संपादनामुळे काही कामे अडली होती
3. नैसर्गिक अडचणींमुळे कामे लांबली होती

मुंबईत 6 दिवसांच्या बाळाचा साडेपाच लाखांना सौदा; आईसह पाच जणांवर गुन्हा दाखल



मुंबई

गोवंडीच्या शिवाजीनगर परिसरात सहा दिवसांच्या बालकाचा साडेपाच लाखांना सौदा करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. कायदेशीर दत्तक प्रक्रियेविना लहान मुलांची खरेदी-विक्री करणाऱ्या टोळीचा पोलिसांनी माग काढला असून दोन महिलांना याप्रकरणी ताब्यात घेतले आहे. बालकाची सुखरूप सुटका करण्यात आली. त्याच्या आईसह पाच जणांविरुद्ध शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिवाजीनगर परिसरात लहान मुलांची बेकायदा खरेदी-विक्री केली जात असल्याची माहिती एका सामाजिक कार्यकत्यार्ला मिळाली. त्याने ही माहिती समाजसेवा करणाऱ्या एका दाम्पत्याला दिली. त्यांनी समीर शेख या व्यक्तीला फोन करत लहान मूल हवे असल्याचे सांगितले. त्याने मुलगी हवी असल्यास चार लाख आणि मुलासाठी साडेपाच लाख रुपये द्यावे लागतील, असे सांगितले. या दाम्पत्याने मुलगा किंवा मुलगी कोणीही चालेल, असे सांगितल्यावर समीरने सहा दिवसांचे बाळ असल्याची माहिती दिली. याबाबत सामाजिक कार्यकर्त्यांनी शिवाजीनगर पोलिसांना कळवले. बुधवारी, ६ ऑगस्ट रोजी नाझिमा अस्लम आणि फातिमा शेख या दोघी ठरलेल्या ठिकाणी बाळ घेऊन आल्या. त्याचवेळी पोलिसांच्या पथकाने त्यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे काही कागदपत्रे आढळली.

दुसऱ्या लग्नाची आस महागात, न्यूयॉर्कच्या डॉक्टरचा मधाळ बोलून गंडा

मुंबई

विवाहित असूनही, लग्न जुळविणाऱ्या एका वेबसाइटवर नोंदणी करून दुसऱ्या पतीसाठी चालवलेली शोधमोहीम बोरिवली येथील वकील महिलेला चांगलीच महागात पडली. न्यूयॉर्क येथे डॉक्टर असल्याचे सांगत गाझा येथे नेमणुकीला असल्याचे भासवून या तरुणाने वकील महिलेला मधाळ बोलण्याने आपलेसे केले. भारतात भेटण्यासाठी येत असल्याचे निमित्त करून वेगवेगळी कारणे पुढे करत या दुसऱ्या वाग्दत्त पतीने तिच्याकडून तब्बल सहा लाख रुपये उकळले आहेत.

निखीला (बदललेले नाव) या वकील महिलेने बोरिवली पोलिस ठाण्यात याबाबत तक्रार



नोंदवली आहे. ही महिला पती आणि मुलासह वास्तव्यास आहे. तिने विवाह जुळविणाऱ्या एका वेबसाइटवर जुलै महिन्यात नोंदणी केली होती. तिचे प्रोफाइल पाहून मोहित गुप्ता या तरुणाने तिला 'रिक्वेस्ट' पाठवली.

निखीला हिने रिक्वेस्ट स्वीकारताच दोघांनी मोबाइल क्रमांकाची देवाणघेवाण केली. मोहित याने आपण न्यूयॉर्क येथे डॉक्टर असून अमेरिकी सरकारने सध्या गाझा येथे नेमणुक केली असल्याचे सांगितले. मोहित याने मधाळ बोलण्याने निखोला हिला आपलेसे केले. तिने त्याच्याकडे भेटण्याची इच्छा व्यक्त केली.

काही दिवसांनी मोहितने तिला एक ईमेल आयडी दिला. यावर त्याच्या सुट्टीसाठी परवानगी मागणारा अर्ज पाठव, असे तिला सांगितले. त्यानुसार तिने अर्ज तयार करून पाठवला. मंजुरी मिळाल्यानंतर गाझा येथे नेमणुकीला असल्याने मला आर्थिक व्यवहार करता येत नाहीत. त्यामुळे गाझा ते फिलिपाइन्स ते भारत असा प्रवास करण्यासाठी पैसे पाठव, मुंबईत आल्यावर देतो, असे मोहित याने सांगताच निखीला हिने दोन लाख रुपये पाठविले.

पैसे मिळताच त्याने विमानाचे तिकीट तिच्या मोबाइलवर पाठवले. त्यानंतर या विमानतळावर अडविले आहे, डॉलर खर्च करता येत नाहीत, अशी कारणे सांगून त्याने तिला सहा लाख रुपये पाठविण्यास भाग पाडले. क्लिअरन्स सर्टिफिकेटसाठी आणखी रक्कम पाठव, अशी मागणी होताच निखिलाने नकार दिला. मात्र त्यानंतर समोरून संपर्क बंद करण्यात आला.

मुंबईच्या झवेरी बाजारातील तिघांविरुद्ध गुन्हा, प्रकरण काय?

मुंबई

सोन्याच्या व्यवसायात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळवून देतो, असे प्रलोभन दाखवून झवेरी बाजारातील तीन व्यापाऱ्यांनी अनेकांची फसवणूक केल्याचा प्रकार उघड झाला आहे. गुंतवलेले ३६ किलो सोने आणि सुमारे १० कोटी रोख असा सुमारे ४४ कोटी रुपयांचा ऐवज



या व्यापाऱ्यांनी डब्बा ट्रेडिंग मध्ये गुंतवला. मात्र, ही रक्कम बुडाल्याने व्यवसायात तोटा झाल्याचे सांगत त्यांनी हात वर केले. या तीन व्यापाऱ्यांविरुद्ध लोकमान्य टिळक मार्ग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लोकमान्य टिळक मार्ग पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या तक्रारीनुसार, पश्चिम उपनगरात वास्तव्यास असलेल्या व्यापाऱ्याचे झवेरी बाजारात दुकान असून, त्याचा सोन्याचे दागिने खरेदी-विक्रीचा व्यवसाय आहे. त्याची ओळख याच परिसरातील नावाजलेल्या मॅक्सिस बुलियन आणि पल्लव गोल्डच्या लादुलाल, पल्लव आणि शुभम यांच्यासोबत झाली. या तिघांनी आपल्याकडे व्यवसायाच्या वेगवेगळ्या योजना असून यामध्ये गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आश्वासन दिले. हे तिघे नावाजलेले असल्याने व्यापारी आणि त्यांच्या नातेवाइकांनी त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवला आणि सुरुवातीला सुमारे दोन कोटी रुपये गुंतविले. या गुंतवणुकीवर चांगला मोबदला मिळाल्याने या व्यापाऱ्याचा

लाडकी बहिन योजनेबाबत सरकार मोठा निर्णय घेण्याची शक्यता

मुंबई

ज्या कुटुंबांचं वार्षिक उत्पन्न हे अडीच लाखांच्या आत आहे, अशा कुटुंबातील महिलांना आर्थिक मदत मिळावी, या उद्देशानं सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. ही एक सरकारची महत्त्वाकांक्षी योजना आहे. या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात दर महिन्याला दीज हजार रुपये जमा करण्यात येतात. मात्र आता सरकार या योजनेबाबत मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे, त्यामुळे रक्षाबंधनापूर्वीच लाडक्या बहिणींना मोठा धक्का बसू शकतो.

लाडकी बहीण योजना जेव्हा सुरू करण्यात आली होती, तेव्हा या योजनेसंदर्भात काही निकष तयार करण्यात आले होते. ज्या



कुटुंबांचं आर्थिक उत्पन्न हे अडीच लाख रुपयांपेक्षा कमी आहे, त्याच कुटुंबातील महिलांना या योजनेचा लाभ देण्यात आला होता, तसेच ज्या महिलांचं वय 65 वर्षांपेक्षा जास्त आहे, अशा महिलांना या योजनेतून वगळण्यात आलं होतं. मात्र या निकषात न बरणाऱ्या देखील काही महिलांनी या योजनेचा लाभ घेतल्याचं समोर आलं आहे, ज्या महिलांचं वय हे 65 वर्षांपेक्षा जास्त आहे, अशा महिलांनी देखील या योजनेचा लाभ घेतल्याचं समोर आलं आहे, तसेच ज्या महिलांकडे सरकारी नोकरी आहेत, त्यातील काही महिलांनी देखील या योजनेचा लाभ घेतला आहे.

एवढंच काय तर चक्क 14 हजार पुरुषांनी या योजनेचा लाभ घेतला आहे, ही योजना फक्त महिलांसाठी असून देखील चुकीच्या पद्धतीनं या योजनेचा लाभ घेतला गेल्याचं समोर आलं आहे. आता या संदर्भात मोठी बातमी समोर येत आहे, ती म्हणजे सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार लाडकी बहीण योजनेत ज्यांनी फसवणूक केली त्यांच्यावर सरकार कारवाई करण्याच्या तयारीमध्ये आहे. लाडकी बहीण योजने अंतर्गत अनधिकृत लाभ घेतलेल्यांवर कारवाई होण्याची शक्यता आहे. मिळत असलेल्या माहितीनुसार 15 दिवसांच्या आत जिल्हाधिकाऱ्यांकडून खात्यांची माहिती मागवण्यात आली आहे, या मध्ये ज्या महिला दोषी आढळतील, त्यांच्याकडून संपूर्ण रक्कम वसूल केली जाण्याची शक्यता आहे, तसेच संबंधितांवर गुन्हे देखील दाखल केले जाऊ शकतात, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

मुंबईत पावसाची तुफान बॅटिंग, कोकणात रेड अलर्ट, पुढील 3 दिवस हवामान खात्याचा अंदाज काय?



मुंबई

गेल्या काही दिवसांपासून विश्रांती घेतलेल्या पावसाने पुन्हा एकदा कोसळायला सुरुवात केली आहे. मुंबई आणि उपनगरांत आज पहाटेपासूनच मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. यामुळे नागरिकांना थोडा दिलासा मिळाला आहे. गेल्या काही दिवसांपासून असलेला उकाडा आणि दमट वातावरणाने त्रस्त झालेल्या मुंबईकरांना पावसामुळे काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. भारतीय हवामान विभागाने (IMD) आज मुंबईसह कोकणात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे. सध्या मुंबईत मुसळधार पाऊस कोसळत आहे. गेल्या काही तासांपासून अंधेरी, जोगेश्वरी, गोरेगाव, मालाड, कांदिवली, बोरिवली, दहिसर, विलेपार्ले, सांताक्रुझ आणि वांद्रे यांसारख्या पश्चिम उपनगरांत ढगाळ वातावरणासह जोरदार सरी कोसळत आहेत. या पावसामुळे मुंबईतील जनजीवनावर काहीसा परिणाम झाला आहे. रेल्वे वाहतूक थोडी विस्कळीत झाली असून, मध्य रेल्वेची वाहतूक सुमारे १५ मिनिटे उशिराने धावत आहे. तर हार्बर रेल्वेची वाहतूक १० मिनिटे उशिराने सुरू आहे. सुदैवाने, पश्चिम रेल्वेची वाहतूक सध्या तरी सुरळीत सुरू आहे.

मुंबई आणि उपनगरांतील हवामानाचा अंदाज मुंबईतील विविध भागांत, विशेषतः दक्षिण मुंबईतील कुलाबा, मरिन ड्राइव्ह तसेच मध्य मुंबईतील दादर, सायन आणि पश्चिम उपनगरांमधील अंधेरी, विलेपार्ले या ठिकाणी आज पावसाच्या सरी कोसळतील असा अंदाज वर्तवला जात आहे. त्यासोबतच नवी मुंबई आणि ठाण्यातही मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. आज दिवसभर आकाश अंशतः ढगाळ राहील. मात्र दमट वातावरण कायम राहण्याचा अंदाज आहे. यामुळे नागरिकांनी घराबाहेर पडताना छत्री किंवा रेनकोट सोबत ठेवावे, अशी सूचना हवामान विभागाने दिली आहे. गेल्या आठवडाभरापासून कोकणातून गायब झालेल्या पावसाने आता पुन्हा जोर धरला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगड या जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. या भागात पुढील तीन दिवस मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या पावसामुळे अनेक भागांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे, त्यामुळे स्थानिकांनी सतर्क राहावे. तसेच समुद्रकिनारी भागात वाऱ्याचा वेग जास्त असल्याने समुद्रही खवळलेला राहणार आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com